रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ७
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, २४ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राज्यात आता क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका



**नाशिक :** राज्यातील नागरिकांना अधिक सुलभ, सुरक्षित व आधुनिक स्वरूपातील शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पात्र नागरिकांसाठीच्या क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका प्रतिकृतीचे अनावरण अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते येवला, (जि. नाशिक) येथील कार्यक्रमात करण्यात आले. या मोहिमेंतर्गत राज्यातील सुमारे १.७० कोटी कुटुंबांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका वितरित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या माध्यमातून शिधापत्रिका व्यवस्थेत अधिक सुलभता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यास मदत होणार असून नागरिकांना शासकीय अन्नधान्य वितरण व्यवस्थेतील सेवांचा अधिक सोयीस्करपणे लाभ घेता येणार आहे. **(सविस्तर पान २ वर..)**

## अंतरंग

‘आरोग्य स्वराज्याची उभारणी प्रत्येकाची जबाबदारी’/२
महाडमध्ये दारूमाफियांना दणका; मुद्देमाल जप्त/५
अर्धशतकासह वैभव सूर्यवंशीचा विश्वविक्रम/८

### नवी मुंबई विमानतळ येथे भारत टॅक्सी सेवेचा शुभारंभ

# सहकाराच्या नव्या पर्वाचा प्रारंभ -मुख्यमंत्री

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकारी तत्त्वावरील 'भारत टॅक्सी' प्रवासी आणि चालकांसाठी एक नवा अध्याय असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली देशात सुरू झालेली ही सहकार क्षेत्रातील भारत टॅक्सी मॉडेल संकल्पना प्रवाशांना रास्त भाड्यात सुरक्षित प्रवास देणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रांगणात गुरुवारी (दि.२३) केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष सोहळ्यात भारत टॅक्सी सेवेचा अधिकृत शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.





या सोहळ्यास केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, लोकनेते स्व. दि.बा.पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, पनवेल मनपाचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्थेचे दीपक तावरे, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे, पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर, ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभागाचे आदिनाथ दगडे, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, सहकार टॅक्सी को-ऑप.लि.चे चेअरमन डॉ. जयेन मेहता, रूपेश धुमाळे आदी उपस्थित होते.

नवी मुंबई विमानतळावर आगमन होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून मानवंदना दिली. कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ओला आणि उबरसारख्या खासगी ॲग्रीगेटर्सनी आजवर वाहतूक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे, मात्र सण-उत्सव किंवा पावसाच्या काळात प्रचंड भाडेवाढ करून सर्वसामान्य प्रवाशांची होणारी लूट आणि चालकांवर लादले जाणारे अवाजवी कमिशन या दोन्ही गोष्टींमुळे प्रवासी व चालक दोन्ही अडचणीत येत होते. या पार्श्वभूमीवर भारत टॅक्सीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राच्या ताकदीवर एक अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि स्वस्त पर्याय उभा राहिला आहे. एकाच मोबाईल ॲपद्वारे कार, ऑटो-रिक्षा आणि बाईक टॅक्सी अशा तिन्ही प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या असून मध्यस्थांची साखळी मोडीत काढून थेट चालक आणि प्रवाशाला जोडणारी ही क्रांती ठरेल.

डिजिटल स्वाक्षरीसह राज्य सरकारने ॲग्रीगेटर धोरणाची चौकट आखून दिली असून संपूर्ण आर्थिक व्यवहारांवर सहकार विभागाचे नियंत्रण असणार आहे. पहिल्या टप्प्यात ६०० टॅक्सींचे अनावरण करण्यात आले असून आगामी काळात एक हजारपेक्षा जास्त टॅक्सींचा टप्पा गाठण्याचे लक्ष्य ठेवले आहे. मुंबई आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांमधून या सेवेचा पहिला टप्पा सुरू होत असून आगामी काळात ही सेवा महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवून प्रवाशांना अधिक सुरक्षित व सुखद अनुभव देण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, सहकार टॅक्सी संस्थेमुळे चालक आता कर्मचारी न राहता थेट सभासद व मालक बनले आहेत. संस्थेच्या नफ्याचा लाभांश (डिव्हिडंड) आता थेट चालकांच्या खात्यात जमा होणार आहे. देशभरातून सुमारे आठ लाख चालक या संस्थेशी जोडले गेले असून अल्पावधीत ७७ कोटी रुपये कोणत्याही कमिशनशिवाय थेट चालकांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. दिल्ली आणि गाझियाबादपाठोपाठ आज मुंबई महानगरात ही सेवा सुरू झाली असून लवकरच पुणे आणि नागपूर येथेही तिचा विस्तार केला जाईल. **(पान २ वर..)**

### स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी

नवी मुंबई विमानतळ परिसरातील स्थानिक आणि प्रकल्पबाधितांच्या अनुषंगाने बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, या नव्या वाहतूक व्यवस्थेमुळे या भागातील भूमिपुत्रांना आणि तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. पहिल्या दीड किलोमीटरसाठी केवळ ३१ रुपये आणि त्यानंतर प्रति किलोमीटर २१ रुपये असा काळी-पिवळी टॅक्सीच्या धर्तीवर निश्चित केलेला सुटसुटीत दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारा आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

# काँग्रेसचे आंदोलन म्हणजे केवळ राजकीय स्टंट!

### वांगचुक यांच्या पत्नीचा राहुल गांधींवर घणाघात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर काँग्रेसने केलेल्या आंदोलनावर समाजसेवक सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली आंगमो यांनी तीव्र शब्दांत टीका केली आहे. काँग्रेसचे हे आंदोलन पूर्णपणे कपटी आणि राजकीय हेतूने प्रेरित होते. काँग्रेस नेत्यांना खरोखरच विद्यार्थ्यांची काळजी असती, तर त्यांनी पंतप्रधानांच्या घराबाहेर स्टंटबाजी करण्याऐवजी जंतर-मंतरवर जाऊन विद्यार्थ्यांच्या आंदोलनात सहभागी व्हायला हवे होते, असे गीतांजली यांनी म्हटले आहे.



काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी आणि पक्षाच्या अन्य नेत्यांनी लोक कल्याण मार्ग येथील पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानाबाहेर २१ जुलै रोजी आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर ‘इंडिया टुडे’ला दिलेल्या मुलाखतीत गीतांजली आंगमो यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. “राजकारणी आता सोनम वांगचुक आणि त्यांच्या प्रतिमेचा स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी वापर करत आहेत, पण आता जनता आणि तरुण वर्ग सुज्ञ झाला असून कोणीही त्यांची फसवणूक करू शकत नाही. पंतप्रधानांच्या घराबाहेरील आंदोलनात प्रामाणिकपणाचा अभाव होता. हा जागृत भारत आहे आणि जे लोक आंदोलनाचा वापर स्वतःसाठी करतील, त्यांना देशातील तरुण फेकून देतील,” असा इशाराही त्यांनी दिला.

“आमच्यासाठी संसद ही सर्वोच्च संस्था आहे आणि संसदेने शिक्षणाला मूलभूत आणि सर्वात महत्त्वाचा विषय म्हणून पाहिले पाहिजे. कोणताही राजकीय अजेंडा न ठेवता या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत आहे, पण स्वतःच्या स्वार्थासाठी येणारे लोक स्वतःहून बाजूला पडतील,” असेही गीतांजली आंगमो यांनी सुनावले आहे.

याच मुद्द्यावरून अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षानेही राहुल गांधींवर टीका केली आहे. आपने राहुल गांधींच्या आंदोलनाचा व्हिडीओ शेअर करत म्हटले की, पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर केलेले आंदोलन पूर्णपणे बनावटी होते. विद्यार्थ्यांसाठी खरोखरच भावना असत्या, तर राहुल गांधी जंतरमंतरवर गेले असते आणि विद्यार्थ्यांसोबत बसले असते.

## निवडक

### आसाममध्ये पुराचा हाहाकार; २४ तासात १० जणांचा मृत्यू

**दिसपूर :** जुलै महिन्याच्या सुरुवातीला काहीसा मंदावलेला नैऋत्य मान्सून आता देशभरात पूर्णपणे सक्रिय झाला आहे. आसाममध्ये पुराचे संकट दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहे. राज्यातील ११ जिल्हे सध्या या भीषण पुराच्या विळख्यात सापडले असून तब्बल ६.५ लाखांपेक्षा जास्त नागरिक यामुळे बाधित झाले आहेत. गेल्या २४ तासात पुरामुळे आणखी १० जणांचा मृत्यू झाला आहे.

### मोशी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना १० लाखांची मदत

**पुणे :** मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या नऊ नागरिकांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची प्रक्रिया पिंपरी-चिंचवड महापालिकेने युद्धपातळीवर सुरू केली आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी दिली.

# पेपरफुटीतील दोषींचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवणार

### पंतप्रधान मोदींची माहिती; तरुणांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नीट पेपरफुटीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत दोषींवर कडक कारवाई करणार असून त्यासाठी फास्ट ट्रॅक खटला चालवला जाणार असल्याचे म्हटले आहे.

सोशल मीडियावरील पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींनी नमूद केले की, देशातील तरुणांचे कल्याण आणि त्यांचे भविष्य यापेक्षा आमच्यासाठी अधिक महत्त्वाचे काहीही नाही. पेपर लीक प्रकरणातील दोषींना लवकरात लवकर आणि अत्यंत कठोर शिक्षा मिळावी यासाठी आम्ही फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित अधिकारी, विभागांना आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा निर्णय म्हणजे विद्यार्थ्यांच्या हक्कांचे आणि भविष्याचे रक्षण करण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांची एक मालिका आहे. जे लोक आपल्या तरुणांच्या भविष्याशी खेळण्याचा किंवा त्यांना हानी पोहचवण्याचा प्रयत्न करतील, त्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही किंवा सोडले जाणार नाही, असेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले.

# राज्यातील सर्वात मोठा परीक्षा घोटाळा उद्धव ठाकरेंच्या काळात -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

"महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठा शिक्षक पात्रता परीक्षा घोटाळा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाविकास आघाडी सरकारच्या काळात घडला. या घोटाळ्यात आयएएस अधिकाऱ्यांपासून ते तत्कालीन मंत्र्यांपर्यंत अनेक जण सामील होते. यात पेपर लीक झालेच, शिवाय नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पास करण्याचा पराक्रम ‘मविआ’ सरकारच्या काळात झाला," असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.२३) केला.



### अराजकता पसरवणे हीच विरोधकांची मानसिकता!

*यूपीए सरकारच्या काळात देशाचे शैक्षणिक बजेट अवघे आठ हजार कोटी रुपये होते, ते मोदी सरकारने एक लाख ३९ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवले आहे. आयआयटी, एम्स यांसारख्या संस्थांसह वैद्यकीय, इंजिनिअरिंग आणि व्यवस्थापन शाखांमधील जागा वाढवून तरुणांना मोठ्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. विरोधी पक्षांमध्ये संसदेत चर्चा करण्याची हिंमत नाही. स्वतःच्या राज्यातील घोटाळे बाहेर येण्याच्या भीतीने विरोधक चर्चेपासून पळ काढत असून देशात अराजकता पसरवणे हीच त्यांची मानसिकता आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.*

मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्लीतील आंदोलन, संसदेतील वाद आणि ठाकरे बंधूंच्या आंदोलनाच्या इशाऱ्याचा जोरदार समाचार घेतला. महाविकास आघाडीच्या काळात टीईटी परीक्षेत झालेल्या गैरव्यवहारांची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले, आमच्या सरकारने टीईटी परीक्षेत गैरव्यवहार होत असल्याचे लक्षात येताच परीक्षा होण्यापूर्वीच घोटाळेबाजांना अटक करून कठोर कारवाई केली, पण ठाकरे सरकारच्या काळात झालेला घोटाळा आणि भ्रष्टाचाराचा स्तर राज्याने यापूर्वी कधीही पाहिला नव्हता.

राहुल गांधी आणि विरोधी पक्षांना खुले आव्हान देत मुख्यमंत्री म्हणाले, विरोधी पक्षांनी पळपुटेपणा सोडून संसदेतील चर्चेला सामोरे जावे. लोकशाहीत निर्णय रस्त्यावर नव्हे, तर संसदेत होतात. जर देशाच्या संविधानावर विश्वास असेल तर संसदेत चर्चा करा, उत्तरे मागा आणि तुमच्याकडे काही चांगल्या संकल्पना असतील, तर सरकारला त्या अमलात आणण्यासाठी भाग पाडा, परंतु आंदोलनांच्या आधारे आपली राजकीय पोळी भाजणे बंद करा. विद्यार्थ्यांचे हित चर्चेतूनच साध्य होऊ शकते. पेपर लीकप्रकरणी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा देण्याचा निर्णय पंतप्रधान मोदींनी घेतला आहे. 'नीट'ची पुनर्परीक्षा अत्यंत पारदर्शकपणे पार पडली असून विद्यार्थी खूश आहेत आणि उत्तीर्ण झाल्यावर आनंदोत्सव साजरा करत आहेत.

मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या विधानाचा समाचार घेताना मुख्यमंत्री म्हणाले, जेव्हापासून राज ठाकरे आणि शरद पवार यांच्यातील अंतर वाढले आहे, तेव्हापासून राज ठाकरेंना सगळीकडे ‘जंतर-मंतर’च दिसत आहे.

# बदलापूर, वांगणी परिसराला वादळी पावसाचा जोरदार तडाखा

### वीजपुरवठा खंडित, जनजीवन विस्कळीत

**बदलापूर : प्रतिनिधी**

बदलापूर आणि वांगणी परिसराला मागील काही दिवसांपासून वादळी वारा आणि मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. बुधवारी रात्रीपासून सुरू असलेल्या या रौद्र रूपामुळे संपूर्ण परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

रात्रीच्या सुमारास सोसाट्याच्या वाऱ्यामुळे बदलापूर शहरात चार ते पाच ठिकाणी झाडे रस्त्यावर आणि वाहनांवर कोसळली. यात सुमारे तीन ते चार वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



दुसरीकडे वांगणी परिसरातील अनेक घरांवरील छतांचे पत्रे वादळी वाऱ्यामुळे उडून गेले आहेत. यामुळे नागरिकांच्या संसारोपयोगी साहित्याचे आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. वांगणी आणि आसपासच्या ग्रामीण भागात वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. सलग दोन दिवस वीज नसल्यामुळे दैनंदिन व्यवहार ठप्प झाले आहेत, तर मोबाइल नेटवर्क खंडित झाल्यामुळे आपत्कालीन संपर्कातही अडथळा निर्माण झाला आहे.

दरम्यान, शेजारील पालघर जिल्ह्यातही पावसाचे पाणी साचून जनजीवन प्रभावित झाले आहे.

### शाळांना सुट्टी, प्रशासनाची सतर्कता

मुसळधार पाऊस, रस्त्यांवर पडलेली झाडे आणि सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने तसेच काही शाळांनी खबरदारीचा उपाय म्हणून शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे वाहनचालकांसह नागरिकांना दळणवळणात बाधा येत आहे. शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले असून पिकांवर संकट ओढवले आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवून नुकसानभरपाई आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे.

## नाशिक शहरातील मंदिरे, पूल पाण्याखाली

**नाशिक : प्रतिनिधी**

मुसळधार पावसाने नाशिक शहराची पुरती दाणादाण उडाली आहे. सलग कोसळणाऱ्या पावसामुळे नाशिकमधील गोदावरी नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. ऐतिहासिक रामकुंड परिसर आणि आसपासची लहान-मोठी मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. पाण्याचा वेढा इतका वाढला आहे की प्रसिद्ध दुतोंड्या मारुतीच्या गळ्यापर्यंत पुराचे पाणी पोहचले असून प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे अलर्ट मोडवर आली आहे.



गंगापूर धरणातून गोदापात्रात पाण्याचा विसर्ग सातत्याने वाढवला जात आहे. सध्या धरणातून १२,६०० ते १३ हजार क्युसेक वेगाने पाणी सोडले जात असून रामकुंड परिसरातील रामसेतू पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे, तर गाडगे महाराज पुलाला पुराचे पाणी टेकले आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी आणि महापालिकेने गोदाघाट परिसरातील सर्व दुकाने, टपऱ्या आणि स्टॉल्स तातडीने हटवण्याचे आदेश दिले आहेत. नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत.



## ‘भगव्या दहशतवादा’च्या फेक नॅरेटिव्हचा पर्दाफाश

ज्यांचा हा देश आहे त्या हिंदूंनाच देशात दहशतवादी ठरवण्याचे षड्यंत्र कसे रचले गेले, याची कहाणी वाचा केंद्रीय गृहमंत्रालयाच्या सुरक्षा विभागाचे माजी अवर सचिव आर.व्ही.एस. मणी यांच्या मुलाखतीतून... सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून राष्ट्रीय सुरक्षेला धाब्यावर बसवणाऱ्या काँग्रेस राजवटीचे हे कारस्थान या मुलाखतीतून उघड झाले आहे. ‘एएनआय’च्या स्मिता प्रकाश यांनी घेतलेली ही मुलाखत संपादित स्वरूपात ‘मुंबई तरुण भारत’ने प्रकाशित केली आहे. ती आम्ही ‘रामप्रहर’च्या वाचकांसाठी येत्या रविवार, २६ जुलैपासून पाच भागांमध्ये रोज सलग प्रसिद्ध करणार आहोत.



# राज्यातील १.७० कोटी कुटुंबांसाठी क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना अधिक सुलभ, सुरक्षित व आधुनिक स्वरूपातील शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.प्रत्येक पात्र नागरिकांपर्यंत क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका प्रतिकृतीचे अनावरण अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते येवला, येथील कार्यक्रमात करण्यात आले.

या मोहिमेअंतर्गत राज्यातील सुमारे १.७० कोटी कुटुंबांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका वितरित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या माध्यमातून शिधापत्रिका व्यवस्थेत अधिक सुलभता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यास मदत होणार असून, नागरिकांना शासकीय अन्नधान्य वितरण व्यवस्थेतील सेवांचा अधिक सोयीस्करपणे लाभ घेता येणार आहे.

स्मार्ट शिधापत्रिका प्रकल्प राबविण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतला होता. जुन्या कागदी शिधापत्रिकांमुळे राज्यातील गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी निर्देश दिले होते. त्यांच्या या संकल्पनेनुसार राज्यातील नागरिकांना स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यासाठी 'स्वर्गीय अजितदादा पवार लोककल्याण स्मार्ट शिधापत्रिका वितरण मोहिम' पुढील तीन वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पांतर्गत 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच एपीएल-शेतकरी योजनेतील शिधापत्रिकाधारकांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. स्मार्ट शिधापत्रिकेमुळे शिधापत्रिकेची हाताळणी सुलभ होण्याबरोबरच लाभार्थ्यांची माहिती अधिक सुरक्षित व अद्ययावत पद्धतीने उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

स्मार्ट शिधापत्रिका प्रकल्पाची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. प्रायोगिक अंमलबजावणीदरम्यान प्राप्त अनुभव व अभिप्रायाच्या आधारे प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यात येईल. त्यानंतर आवश्यक सुधारणा करून संपूर्ण राज्यात स्मार्ट शिधापत्रिका प्रकल्पाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे.

जुन्या कागदी शिधापत्रिका हाताळण्यास अवघड असून त्या फाटणे, खराब होणे किंवा गहाळ होण्याचे प्रमाण अधिक असल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील नागरिकांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

## भाले ग्रामपंचायत सरपंचाविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील भाले ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच दत्ताराम खांबे यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव गुरुवार (दि. २३) झालेल्या विशेष सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीच्या सर्व ९ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केल्याने अविश्वास ठराव शंभर टक्के मतांनी मंजूर झाला.

भाले ग्रुप ग्रामपंचायतीच्या सर्व ९ सदस्यांनी सरपंच दत्ताराम खांबे यांच्या विरोधात तहसीलदार, माणगाव यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला होता. त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेचे अध्यक्षस्थान तहसीलदार बिपीन लोकरे यांनी भूषविले.

सभे दरम्यान सरपंच दत्ताराम खांबे हे अनुपस्थित होते. अविश्वास ठराव दाखल करणारे सर्व सदस्य उपस्थित होते. यामध्ये प्रकाश शेपुंडे, विवेक खानविलकर, सुरेखा कुपळे, अस्मिता चाळके, वैशाली शेपोंडे, रंजना वाघमारे, उपेंद्र जाधव, वर्षा पेंढारी आणि संजीवनी भेसळ यांचा समावेश होता. मतदानावेळी सर्व सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केल्याने ठराव एकमताने मंजूर झाल्याचे तहसीलदारांनी जाहीर केले.

भाले ग्रामपंचायतीच्या इतिहासात प्रथमच सरपंचाविरुद्ध दाखल झालेला अविश्वास ठराव शंभर टक्के मतांनी मंजूर झाल्याने तालुक्याच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

## रक्तदानासाठी पुढे येणे हीच खरी राष्ट्रसेवा –नरेश मसणे

**नेरळ : प्रतिनिधी**

"रक्ताची गरज कोणाला आणि कधी भासेल हे सांगता येत नाही. त्यामुळे केवळ वाढदिवस किंवा विशेष दिवस साजरा करण्यापेक्षा रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमातून समाजासाठी योगदान देणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे," असे भाजप नेरळ शहर मंडळाचे अध्यक्ष नरेश उर्फ पप्पू मसणे यांनी सांगितले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप नेरळ शहर मंडळाच्या वतीने 'महान रक्तदान संकल्प' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नेरळ येथील कै. बापूराव धापटे सभागृह, येथे आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या हस्ते करण्यात आले.

या रक्तदान शिबिरासाठी भाजप नेरळ शहर मंडळाचे अध्यक्ष नरेश उर्फ पप्पू मसणे यांनी पुढाकार घेतला होता. शिबिराला भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला पदाधिकारी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समर्पण ब्लड बँकेच्या माध्यमातून रक्तसंकलन करण्यात आले. या उपक्रमासाठी रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी भाजपचे माजी रायगड सरचिटणीस मंगेश म्हसकर, नेरळ शहर अध्यक्ष संतोष शिंगाडे,माजी शहर अध्यक्ष संभाजी गरुड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा न देता 'रक्तदानातून समाजसेवा' करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला नेरळ परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



## आरोग्य स्वराज्याची उभारणी ही प्रत्येकाची जबाबदारी –डॉ. अभय बंग

**नवी मुंबई : बातमीदार**

"भारतीय समाजव्यवस्थेला पूरक अशी आरोग्यव्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे. केवळ दीर्घायुष्य नव्हे, तर निरोगी, आनंदी आणि अर्थपूर्ण आयुष्य जगण्यासाठी प्रत्येकाने आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आणले पाहिजेत. आरोग्य ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आरोग्य स्वराज्याची सुरुवात आपल्या स्वतःपासून व्हायला हवी," असा प्रेरणादायी संदेश पद्मश्री डॉ. अभय बंग यांनी दिला.

प्रभात ट्रस्ट, नवी मुंबई यांच्या वतीने मराठी साहित्य मंदिर, वाशी येथे आयोजित शिक्षण, साहित्य, आरोग्य आणि




समाजसेवेचा प्रेरणादायी संगम ठरलेला विशेष कार्यक्रम उत्साहात व दिमाखात पार पडला. विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रभात ट्रस्ट आणि स्त्री मुक्ती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या "आता थांबायचं नाय" या उपक्रमातून अनेक वर्षांपूर्वी शिक्षण अर्धवट सोडलेल्या कचरा वेचक महिलांनी पुन्हा शिक्षणाची वाट धरत दहावी उत्तीर्ण होऊन अकरावीमध्ये प्रवेश मिळविल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. आनंदी कांबळे (६५.२०%), प्रतीक्षा कीरतकुढवे (६२.००%) आणि चंदा पटेकर (५८.२०%) यांच्यासह सोनाली कांबळे, मंगल कांबळे, सुनंदा पाठनुरे, अक्षदा गायकवाड, हेमा कांबळे, मुक्ता राठोड, रमा बगाडे आणि संगीता आसवले या सर्व विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले पद्मश्री डॉ. अभय बंग यांच्या "साक्षात्कारी हृदयरोग", "जीवनाचे काय करू?" आणि "आरोग्य स्वराज्य" या स्वलिखित पुस्तकांची ग्रंथतुला. या उपक्रमातून प्राप्त झालेली पुस्तके विविध ग्रंथालयांना भेट देण्यात येणार असून, ज्ञानाचा प्रसार करण्याचा हा अभिनव उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला.

यानंतर "आरोग्य स्वराज्य" या विषयावर बोलताना डॉ. अभय बंग यांनी प्रतिबंधात्मक आरोग्य, संतुलित आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य आणि लोकसहभागावर आधारित आरोग्यव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि विचारप्रवर्तक व्याख्यानाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.याच कार्यक्रमात रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते ख्यातनाम मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भरत वाटवाणी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन पद्मश्री डॉ. अभय बंग यांच्या हस्ते करण्यात आले.

## अलिबाग जिल्हा रुग्णालयात शिवसेनेचा रुग्ण मदत कक्ष

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर शिवसेनेच्या वतीने रुग्ण मदत कक्ष सुरू करण्यात आला.या मदत कशातून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक ती मदत, मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २३) या रुग्ण मदत कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी मोफत चष्मे वाटप करण्यात



आले. शिवसेना जिल्हा प्रमुख राजा कोणी, जिल्हा परिषद सदस्य आदिती दळवी, जिल्हा परिषद सदस्य अनंत गोंधळी, जिल्हा परिषद सदस्य डॉ.सचिन राऊळ, पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील, पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील, समाधान वार्डे, कामगार नेते दीपक रानडे, संजीवनी नाईक ,शिवसेना अलिबाग शहर प्रमुख विकास कर्णेकर , अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हा रुग्णालयात रोज असंख्य रुग्ण उपचारासाठी येत असतात. त्यांना या मदत कक्षाचा फायदा होईल. नवीन रुग्णालय बांधण्यात येत आहे. त्याचे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी मी प्रयत्न करत आहे. हे रुग्णालय झाले की त्यात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. रुग्णांना चांगले उपचार मिळतील.

## वास्तुशास्त्र विषयावर व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

सुप्रसिद्ध वास्तुशास्त्रतज्ज्ञ गौरी केतकर गुप्ते यांचे ''वास्तुशास्त्र हे सध्याची समाजाची एक गरज " ह्या विषयावर वैज्ञानिक आणि समाजोपयोगी व्याख्यान रविवार,१९ जुलै रोजी विद्या प्रबोधिनी इंग्रजी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय (वाणिज्य) मुलुंड पूर्व येथे झाले. ज्ञाती बंधू भगिनी आणि इतर नागरिक ह्या कार्यक्रमास उपस्थित होते

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञाती मंच, मुलुंड ह्या संस्थेच्या वतीने नवीन नवीन नियमित लोकपयोगी उपक्रम , व्याख्याने, समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित केले जातात. लोकउपयुक्त कार्यक्रम धोरणानुसार, येथे, सुप्रसिद्ध वास्तुशास्त्रतज्ज्ञ, गौरी केतकर गुप्ते, यानी " वास्तुशास्त्र हे सध्याची समाजाची एक गरज असल्याचे वैज्ञानिक आणि समाजोपयोगी उदाहरणांनी पटवून दिले. त्या नंतर श्रोत्यांच्या शंकाचे समाधान करून गैरसमज दूर केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे संचालक केतन गुप्ते, यांनी केले,

संचालक आणि अध्यक्ष चंद्रशेखर देशमुख यांनी संस्थेच्या पुढील भविष्यातील कार्यक्रमांचा




आढावा मांडला, संस्थेचे कार्यवाह, योगेश देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले, ाजा केतकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे व्हिडिओ शूटिंग करून ते युट्यूब वर जनजागृतीच्या दृष्टींने प्रसारित करीत आहेत, जास्तीत जास्त चांद्रसेनीय कायस्थ प्रभू बंधुभगिनींनी आपल्या संस्थेचे सदस्यत्व घेऊन चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञातीची वास्तू उभी करण्याच्या अश्वमेध यज्ञात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे.ओंकार गुप्ते, अनिता चं. देशमुख, अमृता गुप्ते, प्रशांत गुप्ते, मिलिंद अधिकारी, डॉ.सुरुची प्रधान , अभिषेक प्रधान, आणि इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

पान १ वरुन

## सहकाराच्या नव्या पर्वाचा प्रारंभ –मुख्यमंत्री

महाराष्ट्रातील सहकाराला बळकटी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली साखर कारखान्यांना १० हजार कोटी रुपयांची मदत मिळाली असून संस्थांच्या डिजिटायझेशनसाठी दोन हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सहकारातून समृद्धी या अभियानात राज्यातील सर्व चालकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी, सहकार हे केवळ संस्था चालवण्याचे माध्यम नसून सर्वसामान्य माणसाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले. भारत टॅक्सीच्या माध्यमातून डिजिटल बुकिंग, पारदर्शक व्यवहार आणि सुरक्षिततेसोबत प्रवाशांना परवडणाऱ्या दरात प्रवास उपलब्ध होणार असून विमानतळावरून मुंबईत जाणाऱ्या प्रवाशांना या सेवेचा मोठा दिलासा मिळेल तसेच या उपक्रमामुळे हजारो बेरोजगारांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होऊन चालकांना सन्मानाचे उत्पन्न मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत त्यांनी सांगितले की, सहकार क्षेत्राच्या बळावर राज्याला दारिद्र्यमुक्त करणे आणि देशाला पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे नेणे शक्य होईल. सोबतच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सुरू झालेल्या शेतकरी कर्जमुक्तीच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचेही त्यांनी स्वागत केले.

यावेळी सहकार टॅक्सी को-ऑप. लि. आणि शासन यांच्यात सामजस्य करार करण्यात आला तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सचिन साळुंखे, सीमा संतोष देवगिरीकर, आनंदराव पावस्कर, संतोष सिंग, हितेश मणिलाल दांड या भारत टॅक्सी सारथींना प्रतिनिधीक स्वरूपात शेअर प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे अक्षय विठ्ठल कीर्ती, नीरज बळीराम नाईक, तुषार पद्माकर पाटील, दिलीप लक्ष्मण पाटील, विलास कर्वे, सुदर्शन बाळकृष्ण म्हात्रे, रोहिदास गायकवाड आणि प्रदीप नारायण म्हात्रे या सारथ्यांना किटचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविकात प्रवीण दराडे यांनी हा उपक्रम सहकारातून समृद्धी या राष्ट्रीय संकल्पनेला नवी दिशा देणारे ऐतिहासिक पाऊल असल्याचे सांगितले. पूर्वी केवळ कृषी व दुग्ध व्यवसायापुरता मर्यादित असलेला सहकार आता डिजिटल अर्थव्यवस्था आणि आधुनिक गतिशीलतेच्या क्षेत्रात एक प्रभावी शक्ती म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार स्थापन झालेल्या केंद्रीय सहकार मंत्रालय आणि केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांच्या दूरदृष्टीमुळे सहकार क्षेत्र आत्मनिर्भर भारत घडवण्याचे मुख्य माध्यम बनले आहे. भारत टॅक्सीच्या माध्यमातून तंत्रज्ञान आणि सहकाराचा संगम साधून हजारो लहान व्यावसायिकांना व चालकांना मालकी हक्क, सामाजिक सुरक्षा, प्रतिष्ठा आणि आर्थिक समृद्धीचा नवीन मार्ग प्रशस्त झाला आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.




## रोहा भाजपतर्फे नेत्र तपासणी शिबिर अन् शेतकऱ्यांना झाडांचे वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा कायम राखत भारतीय जनता पार्टी, रोहा तालुक्याच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त विष्णूनगर येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर व वृक्ष वाटप या दुहेरी सामाजिक उपक्रमाचे आयोजन बुधवार (दि.२२) रोजी करण्यात आले होते.

लाईन्स हेल्प फाउंडेशन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात ९० नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर गरजू रुग्णांना मोफत चष्मे देण्यात येणार असून, ज्यांना गरज आहे त्यांच्या मोफत नेत्रशस्त्रक्रियाही करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. याचवेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत तालुक्यातील



विविध गावांतील शेतकऱ्यांना वृक्षांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी भाजपा रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग म्हणाले, "राजकारणासोबत समाजकारण ही भारतीय जनता पक्षाची ओळख आहे. नागरिकांचे आरोग्य जपणे आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त लोकहिताचे उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक वाढदिवस आणि जयंती समाजासाठी काहीतरी सकारात्मक देणारी ठरली पाहिजे. आगामी काळातही रोहा तालुक्यात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रात असेच विधायक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील."

भाजपा रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या मार्गदर्शनाखाली धाटाव ग्रामपंचायत विष्णूनगर बुथ अध्यक्ष धर्मा कोकरे यांच्या पुढाकारातून नेत्र तपासणी व शेतकऱ्यांना वृक्ष वाटप हा धाटव विभाग अध्यक्ष सचिन मोरे पुढाकाराने हा उपक्रम पार पडला.

यावेळी युवा मोर्चा सरचिटणीस तथा नगरसेवक रोशन चाफेकर, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नरेश कोकरे, महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, शैलेश रावकर, परेश चितलकर, युवा मोर्चा महिला अध्यक्ष रिया कासार, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, किसान मोर्चा अध्यक्ष विकास बामणे, तालुका उपाध्यक्ष परशुराम माने, युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष निलेश जंगम, पंचायत राज प्रमुख तृप्ती बामणे, आशिष गाजीकर, प्रेम शिवसागर यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा अर्ज प्रक्रिया सुरू

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील २०२६ -२०२७ या चालु शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे प्रवेशास सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. रायगड जिल्ह्यातील इयत्ता ५ वी चे सर्व विध्यार्थी , पालक, शिक्षक , मुख्याध्यापक याना कळविण्यात येते की , जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे इयत्ता सहावी साठी प्रवेश परीक्षा अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. ३१ जुलै २०२६ ही अर्ज भरण्याचा शेवटची दिनांक आहे. तसेच दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी निवड परिक्षा रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ठिकाणी होणार आहे. या परीक्षेच्या माध्यमातून जिल्ह्यातून इयत्ता सहावीकरिता ८० विद्यार्थ्यांची परीक्षेच्या माध्यमातून मेरिट प्रमाणे निवड होते.

## झाड पडल्याने गारमाळची वाहतूक प्रभावित

**खोपोली, खालापूर :** बोरघाटातून गारमाळ गाव व धनगर वाड्याकडे जाणाऱ्या मार्गावर झाड उन्मळून पडल्याने या गावांचा संपर्क तुटला होता. गुरुवारी दिवसभर अतिवृष्टी झाल्याने नदी नाले तुडुंब भरून वाहत होते. तर काही ठिकाणी महामार्गावर पाणी साठल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण झाला होता. याच दरम्यान मुंबई पुणे महामार्गावरील बोरघाटातील अंडा पॉइंट जवळून जाणारा तालुक्याचा शेवटचा टोक असलेल्या गारमाळ, धनगरवाडा व आदिवासीवाडी अशा चार पाड्यांना जोडणारा गारमाळ रस्त्यावर अतिवृष्टीने झाड उन्मळून पडले. नंतर रस्ता पूर्ववत झाला.

# धोकादायक इमारतींतील नागरिकांनी त्वरित सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी कोणताही धोका न पत्करता तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, तसेच सर्व गृहनिर्माण संस्थांनी आपल्या इमारतींचे संरचनात्मक (स्ट्रक्चरल) ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

सध्या राज्यातील विविध ठिकाणी तुलनेने कमी वयाच्या इमारतींचे स्लॅब कोसळण्याच्या घटना घडत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिकेने विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. सर्व सोसायट्यांनी तातडीने इमारतीचे संरचनात्मक परीक्षण करून घ्यावे. ऑडिट अहवालात इमारत 'सी-१'



## पनवेल महापालिकेचे आवाहन

(अतिधोकादायक) श्रेणीत असल्याचे निष्पन्न झाले असल्यास त्याची माहिती तात्काळ महानगरपालिकेला द्यावी आणि संबंधित इमारत त्वरित रिकामी करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ ते २६८ तसेच शासनाच्या निर्देशांनुसार पनवेल महानगरपालिकेने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी कार्यक्षेत्रातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणात प्रभाग समिती 'अ' मध्ये ४, 'ब' मध्ये २०, 'क' मध्ये ८ आणि 'ड' मध्ये ३२ अशा एकूण ६४ इमारती 'सी-१' अर्थात अतिधोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. या सर्व इमारतींतील रहिवाशांना सदनिका रिक्त करण्याबाबत वेळोवेळी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

मुंबई उच्च न्यायालय तसेच राज्य शासनाच्या निर्देशांनुसार संबंधित मालक किंवा

**आपत्कालीन परिस्थितीत संपर्क**
**दूरध्वनी : ०२२-७४५८०४०/४१/४२**
**टोल फ्री क्रमांक : १८००-२२७-७०१**

भोगवटादार यांनी पुरेशी संधी देऊनही इमारत रिकामी करून पाडण्याची कार्यवाही न केल्यास अशा इमारतींचा वीज व पाणीपुरवठा खंडित करून, आवश्यकतेनुसार पोलिसांच्या मदतीने इमारत रिकामी करून पाडण्याची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि, काही अतिधोकादायक इमारतींमध्ये अद्यापही नागरिक वास्तव्यास आहेत. पावसाळ्यात अतिवृष्टीची शक्यता लक्षात घेता अशा इमारतींतील रहिवाशांनी विलंब न करता सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे आणि संबंधित इमारती स्वतःहून सुरक्षितरीत्या पाडण्याची कार्यवाही करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

धोकादायक इमारत कोसळून कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित इमारतीतील रहिवासी, मालक व भाडेकरू यांची राहील. तसेच इमारतीचे संरचनात्मक ऑडिट करून घेण्याची जबाबदारीही संबंधित मालक किंवा भोगवटादार यांच्यावरच राहणार असून, त्यासाठी महानगरपालिका जबाबदार राहणार नाही, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची यादी पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून, नागरिकांनी आपल्या परिसरातील अशा इमारतींबाबत सतर्क राहून संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. २३) पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टी पनवेल शहर आणि भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

समाजाप्रति आपले कर्तव्य बजावत आरोग्यसेवेला मोलाची मदत करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या शिबिरात अनेक नागरिकांनी आणि युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या वेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि महापौर नितीन पाटील यांनी शिबिराला भेट देऊन रक्तदात्यांना प्रमाणपत्र वितरित करून त्यांच्या सामाजिक योगदानाचा गौरव केला.

यावेळी माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, रुचिता लोंढे, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, मयुरेश नेतकर, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, नीता माळी, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, सतीश पाटील, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, अमित ओझे आणि युवा मोर्चाचे पनवेल शहर अध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमएनएम विद्यालयात सायबर सुरक्षा, महिला सक्षमीकरण अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात स्थानिक पोलिसांच्या वतीने सुरक्षा व महिला या विषयावर जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्या सायली वडवलकर यांच्यासह शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक दीपक करांडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अशोक साळवे, महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल वृषाली मोकल तसेच महिला पोलीस कर्मचारी मीनाक्षी पाटील यांनी विद्यार्थ्यांना सध्याच्या डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा वापर करताना अनोळखी संपर्क टाळणे, माहिती, फोटो किंवा तपशील शेअर न करणे तसेच ऑनलाइन फसवणूक किंवा सायबर छळ झाल्यास घाबरून न जाता तत्काळ सायबर किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

महिला सक्षमीकरण विषयावर मार्गदर्शन करताना विद्यार्थिनींना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती देण्यात आली. अत्याचार किंवा कोणत्याही प्रकारच्या अन्यायाविरोधात निर्भयपणे आवाज उठविण्याचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच या आपत्कालीन हेल्पलाइनचा वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक दाखवून महत्त्व पटवून देण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे पोलीस पथकाने दिली. शाळेचे सहशिक्षक अविनाश कजबजे यांनी उपस्थित पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांचे आभार मानत विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षितता, जागरूकता आणि महिला सक्षमीकरणाची भावना रुजविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले.

# सीकेटी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त चिमुकल्यांची भक्तिमय वारी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयातील इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागात आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक वारी सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे आणि पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर संगीत शिक्षक रुपेश मढवी आणि संतोष खरे यांनी सुंदर अभंग, भजन व भक्तिगीते सादर करून संपूर्ण परिसर विठ्ठलमय करून सोडला. वारकरी वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात भगवे ध्वज, टाळ व मृदंग घेऊन ज्ञानोबा-तुकाराम आणि पुंडलिक वरदे हरी विठ्ठलच्या जयघोषात भव्य दिंडी काढली. या निरागस भक्तिभावाने संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला होता.

वारकरी परंपरेची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून देणाऱ्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सोहळ्याप्रसंगी चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, संगीत शिक्षक रुपेश मढवी, संतोष खरे, वरिष्ठ लिपिक नंदकुमार देशमुख आदी उपस्थित होते.



# सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी मांडला पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची महासभा बुधवारी (दि.२२) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. या महासभेत सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.



विकसित भारतासाठी दूरदर्शी वाटचाल करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचे सलग कार्यरत असलेले निवडून आलेले नेतृत्व म्हणून ऐतिहासिक विक्रम केला आहे. त्यांनी पं. जवाहरलाल नेहरूंचा सर्वाधिक दिवसांचा कार्यकाळ मागे टाकत नवा इतिहास रचला आहे. याशिवाय सलग तीन वेळा पूर्ण बहुमताने निवडून येणारे ते पहिलेच गैर-काँग्रेस पंतप्रधान आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावावरही काही दिवसांपूर्वी एक नवा विक्रम नोंदविण्यात आला आहे. राज्याच्या इतिहासातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांमध्ये फडणवीस आता तिसऱ्या क्रमांकावर आले आहेत. कार्यकुशल नेता अशी त्यांची ओळख आहे. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री या दोन्ही नेत्यांच्या अभिनंदनाचा ठराव सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी महासभेत मांडला. तो मंजूर करण्यात आला.

# पनवेल पालिकेत लोकमान्य टिळक जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी (दि. २३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी नेते, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत, समाजप्रबोधनकार आणि शिक्षणतज्ज्ञ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.

यावेळी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, तसेच महानगरपालिकेचे सन्माननीय सदस्य, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, लेखाधिकारी संग्राम व्होरकटे, उपमुख्य लेखा परिक्षक संदिप खुरपे पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते, महापालिका अधिकारी



व कर्मचारी उपस्थित होते. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच" हा प्रेरणादायी संदेश देणारे लोकमान्य टिळक यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा दिली. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि जनजागृतीची चळवळ उभारली. केसरी आणि मराठा या वृत्तपत्रांद्वारे त्यांनी समाजप्रबोधन केले तसेच शिक्षण, राष्ट्रप्रेम आणि स्वाभिमानाची प्रेरणा नागरिकांमध्ये जागृत केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या विचारांचा आदर्श समाजाने अंगीकारावा, असे मत व्यक्त केले.

# पनवेल मनपा क्षेत्रात मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष आरोग्य उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन येथील उपजिल्हा रुग्णालयात झाले.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरामध्ये मोफत रक्त तपासणी, एक्स-रे, ईसीजी यांसारख्या वैद्यकीय चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय शासकीय आरोग्य योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा यासाठी आयुष्मान भारत



कार्ड आणि आबा कार्ड नोंदणीसह इतर विविध आरोग्यविषयक तपासण्यांचा लाभ नागरिकांना दिला जात आहे.

उद्घाटनावेळी महापौर नितीन पाटील, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, उपायुक्त अभिषेक परडाकर, डॉ. आनंद गोसावी, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. शिवाजीराव पाटील आदी उपस्थित होते.

# एमएनएम विद्यालयात लोकमान्य टिळक जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. व कनिष्ठ विज्ञान विद्यालयात लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली.

शाळेच्या प्राचार्य सायली वडवलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी पर्यवेक्षक व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक यांच्या कार्याला



अभिवादन केले. यावेळी प्राचार्या सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवेच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच, हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनोगत, देशभक्तीपर घोषवाक्यांद्वारे लोकमान्य टिळकांना अभिवादन केले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि देशसेवेची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# खासगी सुरक्षा रक्षकांना ५५ टक्के आरक्षणाची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

राज्यातील सर्व खासगी सुरक्षा रक्षक मंडळांमधील मंजूर पदभरती प्रक्रियेत नोंदणीकृत व कार्यरत सुरक्षा रक्षकांना किमान ५५ टक्के अंतर्गत आरक्षण अथवा प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने राज्य शासनाकडे केली आहे.

युनियनचे रायगड जिल्हा सरचिटणीस विनायक चंद्रकांत गांधी यांनी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या प्रधान सचिवांना यासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले आहे. निवेदनात महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत कार्यरत सुरक्षा रक्षक अनेक वर्षांपासून अल्प वेतनात प्रामाणिक सेवा बजावत असून त्यांना कामाचा प्रदीर्घ अनुभव असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे मंडळांमधील लिपिक, निरीक्षक, सहाय्यक, कार्यालयीन कर्मचारी आदी पदांवरील भरतीमध्ये अनुभवी सुरक्षा रक्षकांना अंतर्गत आरक्षण किंवा प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच किमान पाच वर्षे नियमित सेवा केलेल्या सुरक्षा रक्षकांना प्राधान्य, सेवाअनुभवानुसार अतिरिक्त गुण, विभागीय निवड प्रक्रियेद्वारे पदोन्नतीची संधी तसेच आवश्यकतेनुसार प्रशिक्षण व कौशल्यविकासाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

शासनाने सकारात्मक विचार करून आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने व्यक्त केली आहे.

## संपादकीय

# पुरेशा पावसाने दिलासा

राज्यात यंदा मान्सूनने सुरुवातीला काहीसा उशीर केल्याने प्रारंभीच्या काळात अनिश्चिततेची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु गेल्या काही दिवसांतील जोरदार पावसामुळे राज्यभरात बहुतेक जिल्ह्यांमध्ये एव्हाना शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मराठवाड्यात मात्र नागरिक अजूनही चांगल्या पावसाच्या प्रतिक्षेतच आहेत.

**पश्चिमेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांचा जोर आणि तीव्रता अधिक झाल्यामुळे राज्यभरात सध्या पावसाची दमदार हजेरी पहायला मिळते आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक धरणांच्या पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ झाली असून या प्रदेशांतील पिण्याच्या पाण्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. गेले दोन दिवस उपनगरांसह संपूर्ण मुंबई शहरात, तसेच ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, नवी मुंबई, पनवेल, भिवंडी, पालघर सगळीकडे पावसाच्या जोरदार सरी बरसल्या आहेत. रायगड जिल्ह्यातही गेल्या दोन दिवसांतील पावसामुळे बहुतेक नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊ लागली आहे. जिल्ह्यातील बहुतेक धरणे भरल्याने पाण्याची समस्या मिटली आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील वाढलेला साठाही नागरिकांना दिलासा देऊन गेला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातही पावसाचा जोर वाढल्याने सर्वच नद्या दुथडी भरून वाहात आहेत. पुरेसा पाऊस झाल्याने सध्या तरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात नियंत्रणात राहण्याची शक्यता दिसते आहे. त्याचबरोबर खरीप हंगामासाठी आवश्यक सिंचनाची उपलब्धताही सुधारेल अशी आशा शेतकऱ्यांना वाटते आहे. पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढल्याने पेरणीनंतरच्या पिकांनाही नवसंजीवनी मिळते आहे. जलसंधारणाच्या दृष्टीने राज्याची सध्याची एकंदर परिस्थिती सकारात्मक म्हणावी अशी आहे. परंतु तरीही हे चित्र सर्वत्र सारखे नाही. मराठवाड्यात अजूनही अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नसल्याने तेथील अनेक धरणांमध्ये पाणीसाठा समाधानकारक नाही. काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत पावसाची कमतरता हे चित्र आता नित्याचे झाले आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या अखेरीस जलव्यवस्थापन करताना प्रत्येक विभागाची वेगळी परिस्थिती लक्षात घेऊन नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. अतिमुसळधार पाऊस झाला की पूरस्थितीलाही तोंड द्यावे लागते आहे. वसई–विरारमध्ये रात्रभर कोसळलेल्या पावसामुळे गुरुवारी नोकरदारांना पुन्हा एकदा साचलेल्या पाण्यातून मार्ग काढत प्रवास करावा लागला. पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांना शाळांना सुटी जाहीर करणेही भाग पडले. कमी वेळात जास्त पाऊस असेच आता पावसाचे स्वरुप वरचेवर दिसत असल्याने ठिकठिकाणच्या जिल्हा प्रशासनांना सतत सतर्क रहावे लागते आहे. जोरदार पाऊस कोसळताच नद्यांचे पाणी पात्राबाहेर येणे, सखल भागात पाणी साचणे, रस्ते बंद होणे अशा घटना अधुनमधुन घडत राहतात. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाची तयारी सतत ठेवावी लागते. याबाबतीत राज्य सरकारने यंदा अधिक चांगली सज्जता ठेवल्याचे जाणवते आहे. तसेच धरणांतील पाण्याचा विसर्गही प्रशासनाकडून योग्य समन्वय राखून केला जातो आहे. हवामान विभागाच्या सूचना व इशारे वेळोवेळी नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि बचाव यंत्रणा सज्ज ठेवणे याबाबतीतही अत्यंत दक्षतेने व कुशलतेने कामगिरी पार पाडली जात आहे. सध्या तरी समाधानकारक पावसामुळे राज्यातील बहुतांश भागांत नागरिक सुखावले असले तरी या समाधानासोबत सावधगिरीही आवश्यक झाली आहे. अतिवृष्टीच्या दृष्टीने सज्जता ठेवणे, गरज नसल्यास घराबाहेर जाणे टाळणे या बाबींची काळजी नागरिकांनीही स्वत:हूनच घेतली पाहिजे. तरच भरलेली धरणे, हिरवीगार शेते आणि सुरक्षित नागरिक अशा सुखरूपपणे राज्यातील अवघा पावसाळा पार पडेल.**

# सायबर स्कॅमचे धोके ओळखा आणि त्यापासून दूर राहा!

आपण सध्या रोज सायबर स्कॅममुळे लाखो रुपयांची फसवणुक झाल्याच्या बातम्या ऐकत असतो. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त आहे. म्हणुनच सायबर स्कॅम ओळखा आणि यापासून दूर राहा–

०१) जर तुम्हाला ट्राय (टेलिफोन ऍथॉरिटी) कडून तुमचा फोन कसा डिस्कनेक्ट करणार आहे याबद्दल सांगितले गेले, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

०२) जर तुम्हाला फेडएक्सने पॅकेजबद्दल बोलावले आणि मोबाईलवर १, ९ किंवा काहीही बटण दाबण्यास सांगितले, तर दाबू नका. तुमचा फोन हॅक होऊ शकणारा हा स्कॅम आहे.

०३) जर एखादा पोलीस अधिकारी तुम्हाला फोन करून तुमच्या आधार कार्डबद्दल बोलत असेल, तर प्रतिसाद देऊ नका. पोलिसांतर्फे असे कधीही कॉल वर विचारले जात नाही. हा स्कॅम आहे.

०४) जर ते तुम्हाला सांगत असतील की तुम्ही 'डिजिटल अरेस्ट' मध्ये आहात, आणि कुणालाही कॉल करू नका, जिथे आहात तिथून हलू नका पुढचे ४८ तास! तर याला प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

०५) जर ते तुम्हाला सांगत असतील की तुमच्यासाठी पाठवलेल्या किंवा तुम्ही पाठवलेल्या एखाद्या पॅकेजमध्ये ड्रग्ज सापडली आहेत, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. (लक्षात ठेवा... कर नाही तर डर कशाची) हे विसरू नका !

०६) जर ते म्हणाले की तुमचा मुलगा/मुलगी ऍक्सीडेन्ट मध्ये सापडला असून आता आमच्या हॉस्पिटल मध्ये आहे, पंधरा मिनिटात ऑपरेशन करावे लागेल, तर तोवर टोकन मनी म्हणून अमुक इतके पैसे पाठवा ! तर अजिबात पाठवू नका! हा स्कॅम आहे. त्यासाठी आधी मुलाला कॉल करून खात्री करून घ्या. मग कळेल की तो तर ऑल रेडी सेफ आहे... कॉलेजात/कँटीनमध्ये!

०७) जर ते तुमच्याशी व्हॉट्सअँप किंवा एसएमएसद्वारे संपर्क साधत असतील, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. (शक्यतो अननोन नम्बरवरून आलेले कोणतेही कॉल अटेंड करू नका! व्हिडीओ कॉल तर मुळीच करू नका अटेंड!

०८) जर कोणी तुम्हाला फोन करून सांगितले की त्यांनी चुकून तुमच्या यू.पी.आय. आयडीवर पैसे पाठवले आहेत आणि त्यांना फक्त त्यांचे पैसे परत हवे आहेत, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. तुमच्याकडे ते शंभर रुपये पाठवतील आणि लिंक अथवा क्यू आर कोड देतील आणि सांगतील की इथे रिटर्न करा! ते अजिबात करू नका! त्यातून तुमचा फोन हॅक करून तुमचे अकाउंट रिकामे करण्याचा हा स्कॅम आहे!

०९) जर कोणी तुमची गाडी किंवा तुमचे वॉशिंग मशिन किंवा तुमचा सोफा विकत घ्यायचा आहे असे म्हणत असेल आणि ते लष्कर किंवा सी.आर.पी.एफ.चे आहेत असे म्हणत असेल आणि तुम्हाला त्यांचे ओळखपत्र दाखवले तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

१०) जर कोणी म्हणत असेल की ते स्विगी किंवा झोमॅटोवरून फोन करत आहेत आणि तुम्हाला १ किंवा इतर कोणताही नंबर काहीही दाबून तुमच्या पत्त्याची पुष्टी करण्याची आवश्यकता असेल तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

११) जर ते तुम्हाला फक्त ऑर्डर रद्द करण्यासाठी किंवा प्रवासासाठी किंवा जे काही करण्यासाठी ओ.टी.पी. शेयर करण्यास सांगत असतील, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

१२) व्हिडिओ मोडवर कोणत्याही कॉलला कधीही उत्तर देऊ नका. त्यासाठी वाटलं तर अशावेळी तुमच्या मोबाईलचा स्क्रीन छताकडे धरून पहा. समोरून कोण कसल्या अवस्थेत (न्यूड टाईप) बोलत असेल तर तुम्हाला ते दिसेल पण त्यांना तुम्ही दिसणार नाही. त्यामुळे नंतर होणारे इमोशनल ब्लॅक मेल थांबेल! नंतर त्या नंबरला लगेच ब्लॉक करा!

१३) तरी गडबडीत तुम्ही त्याला रीस्पॉन्ड केला जरी तरी आणि तो गोंधळ झाल्यास फक्त तो नंबर ब्लॉक करा आणि थोडा वेळ तुमचा मोबाईल बंद ठेवा.

१४) निळ्या रंगात लिहिलेल्या कोणत्याही लिंकवर कधीही घाईघाईत क्लिक करू नका! पाठवणारा माहितीतील आहे का ते आधी चेक करा नाहीतर सरळ तो मेसेज डिलीट करून त्या नंबरला ब्लॉक करा

१५) जरी सी.बी.आय., ई.डी., आय.टी. विभागाकडून नोटीस पाठवली आहे असं कॉल/मेसेज करून सांगितलं असलं तरी पॅनिक होऊ नका! कारण या विभागातर्फे असे कधीही कॉल/मेसेज करून नोटीस पाठवली जात नाही. अधिकृत पोस्टातर्फे तरी येते किंवा त्यांची माणसे फिजिकली नोटीस घेऊन येतात. हे विसरू नका!

१६) अशी पत्रे सरकारी पोर्टल्समधून आली आहेत का ते नेहमी तपासा कारण अनेकदा खाजगी कुरियर तर्फे हि येतात जी डुप्लिकेट असतात. सरकारी नोटीस कधीही खाजगी कुरियरकडून येत नाही.

१७) जर कोणी तुम्हाला उप–समन्स असे सांगत फोन करत असेल आणि तुम्हाला येऊन ते गोळा करावे लागेल किंवा ते पाहण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील, तर त्याला/तिला समन्स किंवा खटल्याच्या फाईलवर संबोधित करण्यासाठी न्यायालयाच्या प्रोसेस सर्व्हरद्वारे किंवा नोंदणीकृत पोस्टद्वारे पाठविण्यास सांगा. जर ते तुम्हाला धमकावत असतील, तर त्या व्यक्तीचा वेळ वाया घालवा. तसेच न्यायाधीशाचे नाव, न्यायालयीन खोली क्रमांक आणि मजला आणि/किंवा इमारत क्रमांक विचारा–जर ती व्यक्ती सांगू शकत नसेल, तर याचा अर्थ असा आहे की हा एक खात्रीलायक स्कॅम आहे.

१८,) जर कोणी फोन करून म्हणतो की तो/ती पोलिस ठाण्यातून फोन करत आहे आणि तुम्हाला बोलावले जात आहे, तर त्याला/तिला ते स्थानिक पोलिस ठाण्यात पाठवण्यास सांगा (तुमचे ठिकाण/शहर उघड करू नका) आणि स्थानिक पोलिस स्टेशनला ते तुम्हाला देऊ द्या.

२०) क्रेडिट/डेबिट/आधार कार्ड क्रमांक, सीव्हीव्ही, मुदत संपण्याची तारीख यासह कोणत्याही डेबिट/क्रेडिट/रुपे कार्ड तपशीलासह कोणालाही कधीही देऊ नका !

२०) ट्रूकॉलर मिळवा. स्पॅम किंवा फसवणूक असे चिन्ह असलेले कॉल उचलू नका. या श्रेणीत येणारे सर्व कॉल ब्लॉक करा.

२१) तुमचे बाबा/आई म्हणाली म्हणून आणि त्यांनी सांगितले म्हणून मी तुम्हाला इतकी आणि इतकी रक्कम पाठवली आहे,. चेक करून सांगा अशी माहिती देणारे कोणतेही कॉल डिस्कनेक्ट करा. तुम्हाला पैसे पाठवत असलेल्या खऱ्या व्यक्तीला फोन करा आणि खात्री करा, मात्र त्यांनी एखादी लिंक पाठवली असेल तर त्यावर अजिबात क्लिक करू नका किंवा क्यू.आर. कोड स्कॅन करू नका किंवा ओ.टी.पी. शेअर करू नका.

२२) कोणी प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्राला आपत्कालीन/आजारपण/अपघाताची माहिती देण्यासाठी फोन केल्यास, पैसे पाठवण्यास/जमा करण्यास सांगत असल्यास तसे काहीही करू नका. प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्र/त्यांच्या कुटुंबियांना स्वतः थेट फोन करा आणि खात्री करा. जर त्या व्यक्तीपर्यंत पोहोचता येत नसेल, तर स्वतः गुगल करा आणि रुग्णालयाला फोन करा व चौकशी करा.

२३) शेयर्स किंवा क्रिप्टोकरन्सी खरेदी करण्याचा सल्ला देणाऱ्या कोणत्याही कॉल/संदेशांना प्रतिसाद देऊ नका. असा साठा खरेदी करू नका कारण निश्चित नफा अपेक्षित आहे. जो तुम्हाला भासवला जातो पण रियलमध्ये कधीही तो तुम्हाला मिळत नाही.

२४) वर्क फ्रॉम होम करण्याचे आश्वासन देणाऱ्या कॉल/संदेशांना शक्यतो प्रतिसाद देऊ नका. ते तुम्हाला जाळ्यात अडकवतात, तुम्हाला नफा दर्शविताना गुंतवणुकीसाठी पैसे पाठवतात. कधीही नफा मिळत नाही. हा स्कॅम आहे.

२५) जर तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीचा/नातेवाईक/मित्राचा वेदनादायक आवाज ऐकू आला, मदत मागत असेल तर पॅनिक होऊन लगेच घराबाहेर पडू नका. खास करून रात्रीच्या वेळी. बाहेर कोण आहे याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करा. प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्राच्या मोबाईलवर/घरी फोन करा. गरज भासल्यास पोलिसांना बोलवा. कारण असं इमोशनली गुंतवून बाहेर बोलावून लुटण्याचा हा स्कॅम आहे.

२६) 'सोप्या कर्जाच्या' ॲप्सच्या जाळ्यात अडकू नका. अनेक कर्जे घेण्यासाठी ते हळूहळू तुम्हाला फसवतात. तुमची गुंतवणूक नष्ट होईल परंतु कर्ज व व्याज भरण्यासाठी तुम्ही जबाबदार असाल.

लक्षात ठेवा की सायबर भामट्याकडून कधीही काहीही मोफत मिळत नाही. तुम्ही अमली पदार्थ/बंदी घातलेली औषधे/बनावट पारपत्र/बेकायदेशीर शस्त्रे आणि दारूगोळा/मानवी तस्करी किंवा मनी लॉन्ड्रिंगसारख्या इतर गुन्ह्यांचा व्यवहार करत नसाल तर तुम्हाला घाबरण्याची गरज नाही! काहीही घडो... मन शांत ठेवा, पॅनिक होऊ नका! तुम्ही पॅनिक झालात की त्या भामट्याचे काम निम्मे सोपे होते मग हिप्नोटाईज पद्धतीने ते तुम्हाला गोंधळून टाकतात आणि लुटतात.

**–डॉ. धनंजय देशपांडे**

## बदलते तंत्रज्ञान

# बाईक व स्कूटरमध्ये अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम

केंद्र सरकारने भारतात उत्पादित होणाऱ्या एंट्री–लेव्हल दुचाकी वाहनांसाठी अँटी–लॉक ब्रेकिंग सिस्टम असणे अनिवार्य केले आहे. यामध्ये इलेक्ट्रिक बाइक्स आणि स्कूटरचाही समावेश आहे. हे वैशिष्ट्य अचानक ब्रेक लावल्यास वाहन घसरण्यापासून रोखते.रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक अधिसूचना जारी केली आहे ज्यामध्ये ऑटोमेकर्सना सर्व दुचाकींमध्ये एबीएस द्यावे लागेल असे म्हटले आहे. यापूर्वी हा नियम १२५ सीसी इंजिन आणि त्याहून अधिक क्षमतेच्या दुचाकींसाठी अनिवार्य होता.



तथापि, ५० सीसी मोटर आणि ५० किमी प्रतितास पेक्षा कमी वेग असलेल्या ईव्हींना यातून सूट देण्यात आली आहे. इतकेच नाही तर, प्रत्येक दुचाकीसोबत, डीलरला दोन बीआयएस–प्रमाणित हेल्मेट (एक स्वारासाठी आणि एक मागे बसलेल्या व्यक्तीसाठी) देखील द्यावे लागतील.


मोटारसायकल आणि स्कूटरमुळे होणारे अपघात कमी करणे हे सरकारचे एबीएस अनिवार्य करण्याचे उद्दिष्ट आहे. देशात रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या दुचाकीस्वारांची संख्या दरवर्षी सतत वाढत आहे.

अँटी–लॉक ब्रेकिंग सिस्टम ही एक अशी तंत्रज्ञान आहे जी अचानक ब्रेक लावल्यास बाईक किंवा स्कूटरची चाके लॉक होण्यापासून रोखते.समजा तुम्ही खूप वेगाने गाडी चालवत आहात आणि अचानक तुमच्या समोरून एखादी व्यक्ती किंवा वाहन आले तर तुम्ही अचानक ब्रेक लावला तर एबीएस नसलेल्या बाईकचे चाक लॉक होऊ शकते, ज्यामुळे बाईक घसरू शकते आणि अपघात होऊ शकतो. या परिस्थितीत, एबीएस वारंवार ब्रेक चालू आणि बंद करते जेणेकरून चाक लॉक होणार नाही आणि तुम्ही बाईक नियंत्रित करू शकाल. अभ्यासानुसार, एबीएस अपघातांची शक्यता ३५–४५% ने कमी करू शकते. ही तंत्रज्ञान विशेषतः पावसात किंवा निसरड्या रस्त्यांवर जीव वाचवू शकते.सध्या, लहान बाइक्समध्ये बहुतेक कॉम्बी–ब्रेकिंग सिस्टम (सीबीएस) असते, जी दोन्ही ब्रेक एकत्र वापरते, परंतु ते एबीएसइतके प्रभावी नाही. नवीन नियमानुसार, प्रत्येक नवीन दुचाकी, मग ती बाईक १०० सीसी असो किंवा ५०० सीसी, मध्ये एबीएस असणे आवश्यक आहे.

# प्रख्यात बासरीवादक पन्नालाल घोष

## निमित्त

पन्नालाल घोष हे एक प्रख्यात बासरीवादक होते. त्यांचे पूर्ण नाव अमल ज्योती घोष असे होते. त्यांनी बासरी या वाद्यात अनेक सुधारणा केल्या तसेच बासरी वादन हे भारतीय गायकीच्या जवळ नेऊन ठेवले. पन्नालाल घोष यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया या लेखातून...



पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी बारिसाल (बांगलादेश) येथे झाला. त्यांचे वडील अक्षयकुमार घोष हे उत्तम सतारवादक होते. वयाच्या चौदाव्या वर्षीच पन्नालाल बासरीकडे आकृष्ट झाले. पुढे १९३४मध्ये त्यांनी मास्टर खुशी महम्मद या संगीतकाराचे शिष्यत्व पत्करले. 'सराईकेला नृत्यमंडळी'त ते काही काळ संगीत दिग्दर्शक होते. 'सराईकेला नृत्यमंडळी'बरोबर १९३८मध्ये पन्नालाल यांना युरोपचा प्रवास घडला. गिरिजा शंकर चक्रवर्ती यांच्याकडे १९३९मध्ये आणि पुढे १९४७च्या सुमारास उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे पन्नालाल यांनी संगीताचे अधिक शिक्षण घेतले.

पन्नालाल घोष हे चित्रपटक्षेत्रात १९४० ते १९४४ या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून होते व पुढेही तेथेच १९५६पर्यंत बासरीवादक होते. या काळात त्यांनी बासरीवादनाचे स्वतंत्र कार्यक्रमही केले. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रात १९५६पासून ते वाद्यवृंद निर्देशक होते. पन्नालाल घोष हे १९४० साली मुंबई येथे वास्तव्यास होते. त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये संगीत दिग्दर्शकाचे आणि बासरीवादनाचे काम केले. त्यांनी बासरीत अमुलाग्र परिवर्तन घडविले. बासरीची लांबी ४०–४२ इंचांपर्यंत वाढविली तसेच बासरीवर बोटे ठेवण्याचे वेगळे तंत्र विकसित केले. पंडितजींनी अनेक नवीन रागांची निर्मिती केली. त्यातील राग जयंत हा एक महत्त्वाचा राग आहे.

पन्नालाल घोष हे बासरीवादनाच्या क्षेत्रातील एक युगप्रवर्तक होत. वेणुवादनाला भारतात दीर्घकालीन इतिहास असला तरी बासरीवादनाला एक स्वतंत्र व स्वायत्त दर्जा मिळवून देण्यात पन्नालाल यांचा फार मोठा वाटा होता. ख्यालगायनातील आलापासारखे विलंबित संगीतविस्तार आणि सतार, सरोद इ. तंतुवाद्यातील 'झाला' सारखे द्रुत वादनप्रकार या दोहोंना बासरीवादनात अंतर्भूत करून पन्नालाल घोष यांनी या वाद्याची सांगीतिक विकसनक्षमता विस्तृत केलीख्यालगायनातील आलापासारखे विलंबित संगीतविस्तार आणि सतार, सरोद इ. तंतुवाद्यातील 'झाला'सारखे द्रुत वादनप्रकार या दोहोंना बासरीवादनात अंतर्भूत करून पन्नालाल यांनी या वाद्याची सांगीतिक विकसनक्षमता विस्तृत केली. यासाठी त्यांनी संशोधन करून मोठ्या व्यासाची, अधिक लांबीची व परिणामतः अधिक स्वरक्षेत्राची बासरी तयार केली. अर्ध, पाव इ. स्वरांतरे आणि मिडकामासारखे संगीतालंकार बासरीवादनातून यशस्वी करून दाखविले.

संगीत दिग्दर्शक आणि रचनाकार म्हणूनही पन्नालाल यांनी कीर्ती मिळविली. त्यांच्या इतजार, बसंत ह्या चित्रपटांच्या संगीतरचना व 'आशा', 'बागेश्री', 'ऋतुराज', 'कलिंगविजय', 'भैरवी', 'ज्योतिर्मय अमिताभ' इ. वाद्यवृंदरचना गाजल्या आहेत. त्यांच्या शिष्यगणांत हरिप्रसाद चौधरी, देवेंद्र मुर्डेश्वर, बेडा देसाई इ. प्रसिद्ध बासरीवादकांचा समावेश होतो. अशा या श्रेष्ठ बासरीवादकाचे २० एप्रिल १९६० रोजी निधन झाले.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सांध्याची सूज व वेदना संपवतील हे घरगुती उपाय

अर्थरायटिस किंवा संधिवात हा एक असा आजार आहे, ज्यामुळे सांध्यांवर सूज चढते व प्रचंड वेदना सुरू होतात. याकडे दुर्लक्ष केल्यास हाडांचे गंभीर आजार होऊ शकतात. खाली दिलेले सोपे उपाय करून तुम्ही वेदना आणि सूजेपासून आराम मिळवू शकता.अर्थरायटिसहा एक सामान्य परंतु त्रासदायक आजार आहे, ज्यामुळे सांधेदुखी, सूज आणि अस्वस्थता होते. हा आजार केवळ वयोवृद्धांमध्येच नाही तर काही वेळा तरुणांमध्येही दिसून येतो. पण आर्थ्रायटिसच्या प्रकारांनुसार वेदनादेखील भिन्न प्रकारच्या असतात. संधिवातामध्ये सकाळच्या वेळी थंड – दमट वातावरणात जास्त वेदना होतात दीर्घ काळासाठी वेदना होतात यासाठी औषधोपचार आवश्यक असले तरी काही घरगुती उपायदेखील यावर प्रभावी ठरू शकतात.



आल्याचा चहा : आल्यामध्ये आढळणारे जिंजरोल हे घटक अँटी–इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. आले सेवन केल्याने सांध्यातील सूज आणि वेदना कमी होतात. एक कप पाणी गरम करा. त्यात एक चमचा किसलेले आले घाला. ५–१० मिनिटे उकळा. चहा गाळून त्यात मध किंवा लिंबाचा रस घाला. हा चहा दिवसातून दोनदा प्या.

हळद : हळदीत असलेल्या कर्क्युमीन या घटकामुळे ते एक प्रभावी अँटी–इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट ठरते. एक कप गरम दूध घ्या. त्यात एक चमचा हळद घाला. चवीसाठी थोडे मध घालू शकता. हे दूध रात्री झोपण्यापूर्वी प्या. हळदीचे दूध नियमित प्यायल्याने सांधेदुखी कमी होते आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

दालचिनी : दालचिनीत अँटी–इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. एक कप गरम पाण्यात अर्धा चमचा दालचिनी पावडर घाला. त्यात एक चमचा मध घाला. हे पेय दररोज सकाळी प्या. दालचिनीचे नियमित सेवन केल्याने सांधेदुखी कमी होते आणि सांध्यातील सूज उतरते.

ॲप्पल सायडर व्हिनेगर : ॲप्पल सायडर व्हिनेगरमध्ये असलेले पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स सांध्यातील विषारी द्रव्ये बाहेर काढण्यास मदत करतात. एक ग्लास गरम पाण्यात दोन चमचे सफरचंद साइडर व्हिनेगर घाला. त्यात एक चमचा मध घाला. हे पेय दिवसातून दोनदा प्या.

गरम पाण्याच्या पिशवीने शेकवा : गरम पाण्याची पिशवी प्रभावित सांध्यावर १०–१५ मिनिटे ठेवा. दिवसातून दोनदा करा.

# माणगाव येथे २,७४८ लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ



**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार, जनतेच्या दारी कल्याणकारी योजनांचा लाभ थेट पोहोचवण्यासाठी बुधवार (दि.२२) रोजी माणगांव येथील गांधी मेमोरिअल सभागृहात "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" अत्यंत उत्साहात पार पडले. यावेळी२,७४८ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात आला व अनाथ लाभार्थ्यांत पोलीस शिपाई पदीनिवड झालेल्या युवकाचा विशेष सन्मान करण्यात आला.

मुख्यमंत्री महोदयांचा वाढदिवस व माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात भव्य शिविराचे आयोजन करण्यात आले होते.सदर भव्य शासकीय कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे ह्या मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच प्रशांत शिंदे, संपर्क प्रमुख, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान, मतदारसंघातील लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे वरिष्ठ शासकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण २,७४८ नागरिकांना निरनिराळ्या योजनांचा लाभ मंजूर करण्यात आला, ज्यातील १०६ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मंचावर मान्यवरांच्या हस्ते लाभ सुपूर्द करण्यात आले, तसेच यामध्ये प्रामुख्याने शासनाच्या सुचनेनुसार, समाजातील वंचित व दुर्लक्षित घटक असलेल्या अनाथ घटकाला प्राधान्याने लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या अनुषंगाने तालुक्यांतील ढालघर येथील रहिवासी ओंकार अनिल शिंदे या युवकास माणगांव प्रशासनाने तत्परतेने अनाथ प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले. या प्रमाणपत्राच्या आधारे अनाथ समांतर आरक्षणांतर्गत ओंकार शिंदे यांची मुंबई पोलीस विभागात पोलीस शिपाई पदी निवड झाली आहे. या यशाबद्दल मंत्री ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते शिबिरात त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

महसूल विभागामार्फत सर्वाधिक नागरिकांना विविध दाखले व योजनांचा लाभ देण्यात आला. त्यामध्ये १,५८८ नागरिकांना जात प्रमाणपत्र, डोमिसाईल, उत्पन्न दाखले, ई. प्रमाणपत्र, ३९७ शेतकऱ्यांना जिवंत ७/१२ मोहिमेतंर्गत सुधारित ७/१२, ६७ शेतकऱ्यांना अग्रीस्टॅक कार्ड, ६१ लाभार्थ्यांना संजय गांधी योजनेचे मंजुरी आदेश, ५३ कुटुंबांना नवीन रेशन कार्ड, २७ नागरिकांना जन्म-मृत्यू नोंदणीचे अधिकृत आदेश, ३ महिलांना जमिनीवर हक्क मिळवून देत लक्ष्मी मुक्ती योजनेचा लाभ, देण्यात आले आहे. पंचायत समिती व शिक्षण विभाग:स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ११ महिला बचत गटांना वैयक्तिक व्यवसायासाठी आर्थिक अनुदान देण्यात आले तसेच शिक्षण विभागामार्फत ११ गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व ३७ लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा वाटप करणेत आले आहे.

आरोग्य सेवेचा विस्तार करण्यासाठी २२१ नागरिकांना आभा कार्ड आणि आयुष्मान भारत कार्डचे वाटप करण्यात आले. नगरपंचायत विभाग माणगांव शहरी भागातील बेघर व गरजू नागरिकांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ६२ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी दिली तसेच शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत ३५ आदिवासी कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला. कृषी विभागामार्फत ४६ शेतकऱ्यांना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना व इतर कृषी योजनांचे लाभ देण्यात आले.

महिला व बाल कल्याणासाठी विविध उपक्रम राबवून लेक लाडकी व प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेअंतर्गत २५ माता व बालकांना योजनेचा लाभ देण्यात आला.

## महाड पोलिसांचा अवैध दारूमाफियांना दणका; १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यांविरोधात सुरू केलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. आदर्श नगर परिसरात मंगळवारी सायंकाळी टाकण्यात आलेल्या धडक छाप्यात पोलिसांनी तब्बल १० लाख २४ हजार रुपयांचा विदेशी मद्यसाठा आणि एक इर्टिगा कार जप्त केली. या प्रकरणी दोन जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरातील अवैध दारू व्यवसायिकांचे धाबे दणाणले असून महाड शहर पोलिसांच्या धडक मोहिमेची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

महाड शहर पोलिसांना २१ जुलै रोजी सायंकाळी आदर्श नगर येथील ए-०१ बिर्याणी शॉपसमोरील रस्त्यावर उभी असलेल्या एमएच-०६-सीयू-२६६८ क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या इर्टिगा कारमधून विनापरवाना विदेशी मद्याची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे व सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक रवि गर्जे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत कारवर छापा टाकला.




झडतीदरम्यान कारमधून रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्कीच्या बाटल्या तसेच ट्युबॉर्ग प्रीमियम बिअरचे बॉक्स मोठ्या प्रमाणात आढळून आले. पोलिसांनी मद्यसाठ्यासह इर्टिगा कार असा एकूण १० लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत आकाश विलास म्हाबले (वय २४, रा. पुनाडेवाडी, ता. महाड) आणि सुरेश कोंडू गोरे (वय ४८, रा. हिरकणीवाडी, ता. महाड, जि. रायगड) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याविरुद्ध महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीमती राघोर्ते करीत आहेत.



**खोपोली : खोपोली वीरेश्वर मंदिर चोरी प्रकरणाचा पोलिसांनी ४८ तासात शोध लावून चोरांना मुद्दे मालासहित पकडले आणि भाविक-भक्त तसेच नागरिकांची आस्था जपली. त्याबद्दल येथील पोलिसांचे भारतीय जनता पक्षातर्फे अभिनंदन करण्यात आले. पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करताना उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेविका अश्विनी अत्रे, शेख व इतर मान्यवर.**

# गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत सुतारवाडीचा गुरुदत्त ढाकणे राज्यात दुसरा

**नागोठणे : बातमीदार**

गुरुकुल एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा गुणगौरव सोहळा नुकताच ज्ञानांकुर इंग्लिश मीडियम स्कूल, खांब (ता. रोहा) येथे उत्साहात पार पडला.या सोहळ्यात रायगड जिल्ह्यातील तालुकास्तरावरील ७० व जिल्हास्तरावरील ११ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे, रजिप शाळा, सुतारवाडी (ता. रोहा) येथील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी कु. गुरुदत्त ढाकणे याने गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्याचा विशेष सत्कार रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी द. ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कोलाड आणि प्रायव्हेट हायस्कूल, पेण या दोन शाळांना आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच बबन निरगुडा, सरोज जितेकर आणि विनोद पन्हाळकर या तीन शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना वैकुंठशेठ पाटील म्हणाले की, गुरुकुल एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर यांच्यावतीने रायगड जिल्ह्यात गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेचा उपक्रम संस्थेचे अध्यक्ष किराण चोगले यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक अशोक अहिरे व त्यांच्या टीमकडून उत्कृष्टपणे राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता शोधून त्यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, यापूर्वी अशा प्रकारचे कार्य क्वचितच झाले आहे. आजच्या स्पर्धात्मक व संशोधनप्रधान युगात विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम, जागरूकता आणि अभ्यासातील नवनवीन पद्धती आत्मसात केल्यास त्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल. गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू, असेही त्यांनी सांगितले.

गुरुकुल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष किराण चोगले, समन्वयक अशोक अहिरे, ज्ञानांकुर स्कूलचे चेअरमन रविंद्र लोखंडे, भाजप रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, महिला तालुका अध्यक्षा अपर्णा सुटे, तालुका उपाध्यक्ष कल्पेश माने उपस्थित होते.



# इरसालगडावर अडकलेल्या पर्यटकांची सुखरूप सुटका

**चौक : प्रतिनिधी**

इरसाल गडावर दोन पर्यटक अडकले आहेत त्यांना मदतीची आवश्यकता आहे, असा मेसेज आला, आणि १९ जुलैची इरसाल वाडी दुर्घटनेची आठवण ताजी करून गेली, आणि सर्वांचा थरकाप उडाला, पण वयोवृद्ध कमळू पारधी, कौस्तुभ कुंभार, आविष्कार पाटील यांनी गड चढून त्यांची सुटका केली.

ठाणे येथील दोन युवक निखिल शिंदे वय वर्ष २० आणि तन्मय शिंदे वय वर्ष १६ राहणार ठाणे चंदनीवाडा हे आज खालापूर तालुक्यातील इरसाल वाडीवर पर्यटनासाठी आले होते,आज धो धो पाऊस पडत आहे, सोसायट्याचा वारा,पाऊस आणि धुक्याची चादर ज्याने समोरचे दिसत नव्हते, असे वातावरण असल्याने युवक घाबरले आणि रस्ता चुकले, पुढे पाय टाकावा तर दरड त्यामुळे अपघाताची शक्यता, त्यामुळे त्यांनी जागचे हलायचे नाही असे ठरवून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.११२ नंबरवर फोन करून मदतीची गरज व्यक्त केली, आणि चौकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांनी स्थानिक पोलीस, कमलू पारधी,निखिल मालुसरे,कौस्तुभ कुंभार, आविष्कार पाटील, गाव पोलीस पाटील यांच्या मदतीने या दोन तरुणांना सुरक्षित खाली उतरवून आणले.

इरसाल वाडीच्या दुर्घटनेला तीन वर्षे पूर्ण झाली. ही आठवण देणारी घटना ताजी असताना असा प्रसंग समोर आल्याने पोलिसांची तारांबळ झाली होती. कौस्तुभ कुंभार हा तरुण आविष्कार पाटील याला घेऊन इरसाल वाडी वर मदतीसाठी गेला. सर्वांशी संपर्क झाल्याने हा रेस्क्यू ऑपरेशन अत्यंत कमी वेळात आणि कुशलतेने पार पडले, कमळू पारधी वय वर्ष ८० फक्त .१९ जुलै २०२३ रोजी घडलेल्या दुर्घटनेत कमळुदादा याच्या कुटुंबातील पाच सदस्य काळा आड गेले तरीही नेहमीच प्रत्येक शोधकार्यात निस्वार्थ मदत करत असतात तसेच पावसाची तमा न बाळगता गडावर पोहचुन कौस्तुभ कुंभार व सहकारी यांच्यासह दोन पर्यटकांना सुखरूप घेऊन आले.चौकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांनी कमलू पारधी, कौस्तुभ कुंभार, आविष्कार पाटील यांचा सन्मान केला.



## कर्जत मेडिकल असोसिएशनतर्फे चर्चासत्र

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने नेरळ येथे आरोग्य चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. रुग्णांनसाठी वेदनाशामक गोळ्यांचे दुष्परिणाम या विषयवार चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.वेदनाशामक गोळ्या घेणे किती धोकादायक आहेत. या बद्दल आयोजित चर्चासत्रात कर्जत शहरातील सर्व डॉक्टर सहभागी होते.



रुग्णानी स्वतःच वेदनाशामक गोळ्या घेणे धोकादायक या विषयावर नेरळ येथील डॉ शेवाळे यांच्या धन्वंतरी नर्सिंग होम मधे झालेल्या शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन कर्जत मेडिकल असोसिएशनच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी रायगड मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ आशुतोष कुलकर्णी, तसेच डॉ कुमार ओसवाल, सुकाणू समिती सदस्य डॉ प्रभाकर काळे, डॉ बी जी लाड, डॉ सुहास शितुत, डॉ कुणाल राठोड, डॉ जयश्री देशमुख, डॉ भोपतराव, डॉ राकेश पाटील , डॉ गीता काळे , डॉ रवींद्र गर्जे आणि नेरळ कर्जत तालुक्यातील अनेक डॉक्टर्स ह्या कार्यक्रमास उपस्थित होते. सुरुवातीला उप संपादक डॉ विकास गोमारे ह्यांनी त्यांचा परिचय करून दिला. अध्यक्ष डॉ प्रशांत गांगल यांनी स्मृती चिन्ह देऊन डॉ पराग लाड यांचा सन्मान केला.

अस्थिरोग तज्ज्ञ डॉ पराग लाड यांनी सामान्य रुग्णांसाठी हा महत्त्वाचा संदेश दिला की डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कुठलेही वेदनाशामक गोळ्या घेणे आरोग्यास हानिकारक ठरू शकते. किडनी, हृदयरोगासारखे विकार वाढू शकतात. कर्जत मेडिकल असोसिएशन ने डॉक्टरांसाठी आयोजित केलेल्या एका शैक्षणिक सत्रात अस्थिरोगामध्ये वेदनाशामक औषधे आदी विषयावर परखड मते मांडली.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३. कार्यालय, पनवेल नवी मुंबई. | ०४ सुबाभूळ व ०१ उंबर अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३, नित्यानंद मार्ग, H.O.C. कॉलनी, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील ०५ झाडे कार्यालयाच्या भिंती लगत असून, झाडांची मुळे भिंतीत रूजल्याने धोकादायक व पडण्याची (उन्मळून) शक्यता आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र. २२५/२३८/२०२६**
**दिनांक :- २३/०७/२०२६**



जा क्र. ग्रामपंचायत, पळस्पे/नोटीस/२०२६/८३ दिनांक : २३ जुलै २०२६

प्रति.

**जाहीर नोटीस**

श्री. श्रिनावस त्रिंबक नवाथे, मोरेश्वर त्रिंबक नवाथे, अर्चना मुकुंद पाध्ये, सुशिला सुधिर खांडेकर, साधना जयवंत धारुरकर, प्रभाकर महादेव घाटे मिळकत क्रमांक २११ पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड

**विषय :** मौजे पळस्पे येथील आपले जीर्ण, मोडकळीस आलेले व धोकादायक घर/बांधकाम तातडीने उतरवून घेण्याबाबत/पाडण्याबाबत.

**संदर्भ :** १. मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचे पत्र जा.क्र./नैसर्गिक आपत्ती/कात २/२०२६, दिनांक २२/०७/२०२६.
२. ग्राम महसूल अधिकारी, पळस्पे यांचा पाहणी अहवाल दि. ०६/०७/२०२६.
३. तरुण उत्साही मित्र मंडळ व ग्रामस्थ, पळस्पे यांचा अर्ज दि. ०२/०७/२०२६
४. ग्रामपंचायत कडील जा.क्र. ६३/२०२६/२७ दि. ०७/०७/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भाकित पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, मौजे पळस्पे गावातील आपले मालकीचे/ताबा असलेले घर/इमारत ही अत्यंत जीर्ण, मोडकळीस आलेली असून अनेक वर्षांपासून ओसाड व धोकादायक अवस्थेत पडून आहे. सदर वास्तूमुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठा आपत्कालीन प्रसंग निर्माण होऊन सार्वजनिक सुरक्षिततेला, तसेच जीवित व वित्त हानीचा गंभीर धोका निर्माण झालेला आहे.

यास्तव, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम ५२ व ५३ मधील तरतुदींनुसार, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ३० व ३४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून आपणास ही नोटीस बजावण्यात येत आहे.

१. सदर नोटीस मिळाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत आपले सदर जीर्ण व धोकादायक बांधकाम आपण स्वखर्चाने सुरक्षितपणे उतरवून (पाडून) घ्यावे व सदर जागा धोकेमुक्त करावी.

२. दिलेल्या मुदतीत आपण सदर धोकादायक बांधकाम न हटवल्यास, ग्रामपंचायत प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे सदर बांधकाम शुक्रवार दिनांक ३१/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाडण्याची (Demolition) कारवाई करण्यात येईल.

३. या कारवाईत होणारा सर्व खर्च नियमानुसार आपल्याकडून वसूल केला जाईल, अथवा आपल्या मिळकतीवर त्याचा बोजा चढविण्यात येईल तसेच पत्र मिळाले पासुन पुढील काळात कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर व आर्थिक जबाबदारी आपली राहील, याची नोंद घ्यावी.

तरी सदरचे पत्र मिळताच इमारत पाडण्याबाबत कारवाई करणेत यावी.

**सही/-**
**श्री. सुदिन धनाजी पाटील**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**पो. पळस्पे, ता. पनवेल**
**जि. रायगड**

# नवीन पनवेल भाजप मंडळाचे रक्तदान शिबिर उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल भाजप मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेत पार पडले. समाजहिताचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिक आणि भाजप कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

न्यू पनवेल कर्नाटक संघ हॉल येथे आयोजित या शिबिराला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, संतोष शेट्टी, शशिकांत शेळके, नगरसेविका कविता चौतमोल, सीता पाटील, राजेश्री वावेकर, डॉ. अस्मिता घरत, कुसुम पाटील, ॲड. शिवानी घरत, नवीन पनवेल शहर मंडळाचे सरचिटणीस प्रशांत फुलपगार, जगदीश घरत, पंकज घाडी, आरपीआयचे प्रभाकर कांबळे, नवीन पनवेल शहर मंडल युवा मोर्चा अध्यक्ष मयूर कदम, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय सिंग, प्रभाग १५ अध्यक्ष संजय कांबळे, प्रभाग १६ अध्यक्ष शिवाजी भगत तसेच प्रभाग १७ अध्यक्ष विजय म्हात्रे उपस्थित होते. यावेळी आयोजक नवीन पनवेल भाजप मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक दशरथ म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत व आभार मानले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक करत रक्तदान हे सर्वोत्तम दान असून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरत असल्याचे सांगितले. वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या अशा उपक्रमांचे आयोजन महत्वपूर्ण असल्याचे दशरथ म्हात्रे यांनी म्हटले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करून त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# बनावट गुंतवणूक योजनेद्वारे ४७ कोटींची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या फायनान्शियल इंटेलिजन्स युनिटने बनावट गुंतवणूक योजनेच्या माध्यमातून तब्बल ४७ कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात आतापर्यंत दोन प्रमुख आरोपींना अटक करण्यात आली असून कंपनीचे पदाधिकारी, एजंट व इतर प्रतिनिधींविरुद्ध एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे आणि पोलीस उपायुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. एफआययू युनिटकडे प्राप्त झालेल्या निनावी तक्रारीनंतर तपास सुरू करण्यात आला. तपासात ऑसम स्वदेश एलएलपी या कंपनीच्या माध्यमातून आकर्षक परतावा, दरमहा उत्पन्न, कमिशन तसेच डायमंड गिफ्टसारख्या आमिषांचे प्रलोभन दाखवून नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक स्वीकारण्यात आल्याचे उघड झाले. सुरुवातीला काही गुंतवणूकदारांना परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात रक्कम जमा करून परतावा देणे बंद करण्यात आल्याचे तपासात समोर आले.

या प्रकरणी कंपनीचे सीईओ सुनील पालवे, मार्केटिंग डायरेक्टर जयदेव गंधे, आशीष बर्वे, अमोल जाधव, एजंट नवनाथ रेपाळे, दिनेश कोळंबे तसेच इतर प्रतिनिधी व एजंटांविरुद्ध एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्राथमिक तपासात सुमारे ४,५०० गुंतवणूकदारांकडून ४७ कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा करण्यात आल्याचे समोर आले असून त्यापैकी मोठ्या प्रमाणात निधीचा अपहार झाल्याची तक्रार आहे. या प्रकरणात सुनील पालवे आणि नवनाथ रेपाळे यांना अटक करण्यात आली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सदाशिव निकम करीत आहेत. सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीचे आर्थिक व्यवहार, बँक खात्यांची माहिती, निधीचा प्रवाह तसेच इतर संबंधित कागदपत्रांची सखोल चौकशी सुरू आहे. दरम्यान, या योजनेत फसवणूक झालेल्या इतर गुंतवणूकदारांनी आवश्यक कागदपत्रांसह नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी.

# विनर्स ट्रस्टची वारकऱ्यांसाठी अनोखी सेवाभावी वारी



**नवी मुंबई : बातमीदार**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी विनर्स एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टने राबविलेल्या 'जॉय ऑफ गिव्हिंग, शेअरिंग अँड केअरिंग' या उपक्रमाचे शंभरावे सत्र उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. विनर्स गुरुकुल (नाईकबोमवाडी) तसेच वाजेगाव, फलटण-लोणंद येथे आयोजित या उपक्रमांतर्गत वैराटवासी स्वामी आबानंदगिरी दिंडी (क्र. १६३) मधील वारकऱ्यांना विविध अत्यावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

विनर्सचे संस्थापक गुरुवर्य शशिकांत खामकर आणि ज्योती खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांना छत्र्या, रेनकोट, फर्स्ट एड बॉक्स, ओआरएस टेट्रा पॅक, पिण्याचे पाणी तसेच फराळाचे साहित्य वितरित केले. याशिवाय संपूर्ण दिंडीसाठी अन्नदानाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. पावसाळ्यातील प्रतिकूल परिस्थिती लक्षात घेऊन करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे वारकऱ्यांना मोठा आधार मिळाला.

या सेवाभावी उपक्रमात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, पुणे, कोल्हापूर आणि कोकण परिसरातील विनर्स परिवारातील सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सेवाभावाची परंपरा जपली. वारी ही केवळ भक्तीची वाटचाल नसून समाजसेवा, सहकार्य आणि माणुसकीचा संदेश देणारी परंपरा असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

ट्रस्टच्या या उपक्रमाचे वारकरी आणि स्थानिक ग्रामस्थांनी मनापासून स्वागत करत कौतुक केले. या उपक्रमाचे नियोजन विनर्सचे विश्वस्त गजेंद्र जुईकर, विनर्स गुरुकुलचे शिक्षकवृंद तसेच 'जॉय ऑफ गिव्हिंग' टीमने केले.

# कोपरखैरणेत तरुणावर जीवघेणा हल्ला

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे सेक्टर-१९ येथील योगिता मेडिकलजवळ शिवसेना शाखेसमोर रविवारी रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेत दोन तरुणांनी तलवार व चॉपरचा धाक दाखवत एका तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार समोर आला आहे. या हल्ल्यात वाद मिटविण्यासाठी पुढे आलेल्या पीडिताच्या आईलाही डोक्यात मारहाण करण्यात आली. या प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस), शस्त्र अधिनियम तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे, तर दुसरा आरोपी अद्याप फरार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रात्री सुमारे १०.२५ वाजण्याच्या सुमारास सेक्टर-१९ येथील योगिता मेडिकलजवळ ही घटना घडली. फिर्यादीच्या भावास आरोपी साहिल अलाउद्दीन शेख (२२) याने फोन करून बोलावले. त्यानंतर साहिल शेख व त्याचा साथीदार यश विनोद सेंटाने (१९) यांनी तलवार व चॉपरसारखी धारदार शस्त्रे हातात घेऊन परिसरात दहशत निर्माण केली. आरोपींनी फिर्यादीच्या भावाला जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केली.

घटनेची माहिती मिळताच फिर्यादीची आई वाद मिटविण्यासाठी घटनास्थळी आली. मात्र आरोपींनी त्यांनाही मारहाण केली. त्यांच्या डोक्याला दुखापत झाल्याने त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १९२(२), १९२(५), ३५२(३), ३(५) तसेच शस्त्र अधिनियम ४, २५ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी साहिल अलाउद्दीन शेख याला अटक करून न्यायालयात हजर केले आहे. तर दुसरा आरोपी यश विनोद सेंटाने हा अद्याप फरार असून त्याचा पोलीस शोध घेत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास कोपरखैरणे पोलीस करत आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, सेक्टर-१९ मधील संबंधित गल्लीत काही तरुण नियमितपणे बसून अमली पदार्थांचे सेवन करतात. याबाबत त्यांना अनेक वेळा "येथे बसू नका" अशी समज देण्यात आली होती. मात्र, त्यांनी कोणाचेही न ऐकता तेथेच वावर सुरू ठेवल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. या तरुणांच्या भीतीपोटी अनेक रहिवासी त्यांना विरोध करण्याचे टाळत असल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे.

# सीबीडी बेलापूरमध्ये वकिलाच्या कार्यालयातून रोकड चोरली

**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी बेलापूर येथील एका वकिलाच्या कार्यालयातील स्टोअर रूमचे कुलूप तोडून दोन लाख ५० हजार रुपयांची रोकड आणि व्यवसायाशी संबंधित सुमारे १५० ते २०० महत्त्वाच्या फाईल्स चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

फिर्यादी हे वाशी सेक्टर-२९ येथील रहिवासी असून वकील व कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे सीबीडी बेलापूर सेक्टर-११ येथील महावीर आयकॉन इमारतीतील कार्यालयाबाहेरील स्टोअर रूममध्ये ही चोरी झाली. १७ जुलै रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ४ यादरम्यान आरोपींनी संगनमत करून स्टोअर रूमचे कुलूप तोडले. त्यानंतर लोखंडी रॅकमध्ये ठेवलेली दोन लाख ५० हजार रुपयांची रोकड तसेच व्यवसायाशी संबंधित सुमारे १५० ते २०० महत्त्वाच्या फाईल्स चोरून नेल्याचा आरोप आहे.

# दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील कुंडेवहाळ बसस्थानकाजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीने रस्त्याने चालत जाणाऱ्या दोघांना धडक दिली. या अपघातात ३५ वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

या अपघातात मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव राजुकुमार बिंद (३५) तर जखमी झालेल्या त्याच्या मित्राचे नाव चंदलाल राममल्हार बिंद (३०) असे आहे. चंदलाल बिंद व त्याचा मित्र राजुकुमार बिंद हे दोघे ओव्हळे येथून कुंडेवहाळच्या दिशेने पायी जात होते. दोघेही कुंडेवहाळ बसस्थानक रस्त्यावर आले असताना मागून येणाऱ्या भरधाव मोटारसायकलने दोघांना जोरदार धडक दिली.

# आषाढी वारीनिमित्त नवी मुंबई पालिकेकडून पंढरपूरनगरी स्वच्छताकार्य

**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथे लाखो भाविक दाखल होत असल्याने परिसर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या 'स्वच्छता अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार पंढरपूरनगरी स्वच्छतेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे विशेष पथक पाठविण्यात आले होते. नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी पंढरपूरला जाणाऱ्या विशेष पथकाच्या नवी मुंबईतून पंढरपूर प्रस्थानाप्रसंगी आवर्जून उपस्थित राहून या पथकास उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा प्रदान केल्या होत्या.



या विशेष स्वच्छता पथकाने २१ आणि २२ जुलै रोजी दोन दिवस अतिरिक्त आयुक्त सुनील पवार तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून सेवाभावाचे दर्शन घडविले. पथक प्रमुख स्वच्छता निरीक्षक लवेश पाटील आणि नवनाथ ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली ३० स्वच्छता दूतांनी २१ व २२ जुलै असे सलग दोन दिवस विठ्ठल मंदिर परिसर, मार्केट परिसर, चंद्रभागा नदीवरील उड्डाणपूल येथील स्वच्छतेकडे विशेष लक्ष देत अथक स्वच्छताकार्य केले.

यासोबतच चंद्रभागा नदीपात्राचीही साफसफाई केली. त्या ठिकाणच्या सार्वजनिक शौचालय परिसराची जंतुनाशक फवारणी करण्यात आली. या कामात सर्व स्वच्छतादूतांनी भक्तीभावाने सेवाभावी वृत्तीने उत्साहात सहभाग घेतला. नवी मुंबई महानगरपालिकेचेच्या या विशेष स्वच्छता पथकाने पंढरपूर शहर स्वच्छ, सुरक्षित व रोगमुक्त ठेवण्यासाठी समर्पित भावनेने कार्य केले व सालाबादाप्रमाणे यावर्षीही वारीतील स्वच्छतेची परंपरा राखली.

# कोकण भवनात स्व. अजित पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त कोकण भवन येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्य शासनाने त्यांच्या जयंतीचा अधिकृत कार्यक्रमांत नव्याने समावेश केल्यानंतर २२ जुलै रोजी कोकण भवनात विविध शासकीय विभागांचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र येत दिवंगत नेत्याच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

या कार्यक्रमाप्रसंगी कोकण विभागाच्या अपर आयुक्त (महसूल) वैशाली इंदानी-उंटवाल, सामान्य प्रशासन विभागाचे तहसीलदार गणेश धुमाळे, सहायक संचालक (लेखामेळ) दीपक काटे, नायब तहसीलदार (इमारत) सुरेश रोकडे यांच्यासह इतर शासकीय अधिकारी प्रमुख उपस्थित होते. सुरुवातीला अपर आयुक्त वैशाली इंदानी-उंटवाल यांनी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर तहसीलदार गणेश धुमाळे तसेच विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली व्यक्त केली. प्रशासकीय कामातील त्यांची शिस्त, निर्णयक्षमता आणि राज्य विकासातील योगदानाची आठवण यावेळी उपस्थितांनी केला.






**नवी मुंबई :** भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ओळखले जाणारे थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजूसिंह चव्हाण आणि अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



**नवी मुंबई :** नूतन मराठी विद्यालय नेरूळ शाळेच्या नेरूळ पूर्व परिसरात वृक्षदिंडी व वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन पारंपरिक वेशभूषा केली होती. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप कांबळे, सुजाता मुंढे, मनीषा पंडित, सुनील पाटील यांनी दिंडीचे यशस्वीपणे आयोजन केले होते.




**पनवेल :** महाराष्ट्र राज्याचे कार्यकुशल व लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्वतःच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुळसुंदे ग्रामपंचायतीचे सदस्य सतिश साठे यांनी वावेघर येथे आयोजित शिबिरात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या रक्तदान शिबिराला विभागीय जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, गुरुनाथ गाताडे, चंदर माने यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आरोग्यदायी संदेश दिला.

# शेतकरी, सर्वसामान्य जनतेला जलद सेवा देण्याचा प्रयत्न -ना. गोगावले




**महाड : प्रतिनिधी**

संपुर्ण राज्यात शेतकरी व कष्टकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घेता यावा यासाठी आवश्यक असलेले दाखले एका छताखाली जलद गतीने मिळावे व त्यासाठी जनतेला शासकीय दरबारी हेलपाटे मारावे लागू नयेत म्हणून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर सुरू करण्यात आले असून जनतेने त्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन रोहयो मंत्री भरतशेठ गोगावले यांनी महाड विधानसभा मतदार संघात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आयोजित महाराजस्व समाधान शिबिरात केले .

यावेळी व्यासपीठावर राजिपचे अर्थ व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, शिबिराचे समन्वयक बिपीन महामुणकर महाड पंचायत समिती सभापती प्रेरणा सावंत उपसभापती सुरेश महाडिक, पोलादपूरचे सभापती शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, तालुका अध्यक्ष निलेश महाडीक महाडचे उपनगराध्यक्ष संदीप जाधव, महाडचे प्रांताधिकारी पोपट ओमासे, माणगांव चे प्रांताधिकारी सानप, महाड तहसिलदार महेश शितोळे, पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे व सर्व पक्षिय पदाधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीस महाडचे प्रांताधिकारी ओमासे यांनी गतीमान व लोकाभिमुख प्रशासनाव्दारे शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील जनते पर्यत पोचावा यासाठी हे शिबीर आयोजित केल्याचे सांगत चित्रफिती व्दारे शासकीय योजनांची माहिती दिली.

यावेळी बोलताना ना. भरतशेठ गोगावले यांनी दरवर्षी मृख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस एकत्रित साजरा होत असतो मात्र या वर्षी अजित पवार यांची जयंती साजरी करावी लागत असल्याची खंत व्यक्त करीत अजित दादांची कामाची पद्धत त्यांचा वक्तशीरपणा याचे कौतुक करीत महाराष्ट्र त्यांचे कार्य विसरणार असे सांगितले.

महायुतीच्या गतीमान सरकारने शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील जनतेला मिळावा यासाठी अनेक अडचणी दूर केल्या आहेत. एन ए च्या परवानगीला ६ महिने ते १ वर्ष लागत असे. त्याचे अधिकार आता टाऊन प्लॅनिंगला देण्यात आल्याने ही परवानगी आता जलद मिळते. गावठाणची जागा कुणाच्याही मालकीची नसून त्यावर कुणी हक्क सांगून शासनाची अडचण करू नये असा सल्ला त्यांनी लोकप्रतिनिधी व जनतेला देत नियमाने चला व प्रशासनाशी समन्वय ठेवा असे सुचवले.

शासनाने दिव्यांगांची पेन्शन वाढवली असून लाडक्या बहिणींप्रमाणे ६५ वर्षवरील निराधारांनाही पेन्शन सुरु केली असल्याचे सांगत कोकणातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देताना विदर्भ मराठवाड्या सारखे निकष लावू नये यासाठी आपण प्रयत्न शिल असल्याचे सांगत २०२१ मध्ये आलेल्या महापुराची पातळी गाळ काढल्याने पुढील वर्षात कमी झाली पुढल्या वर्षी सावित्री नदीपात्रातील शिल्लक जुठा काढण्याचे आदेश प्रशासनाला देत महाडला पाणी पुरवठा करणारी वाहून गेलेल्या पाईप लाईनचे काम येत्या एक दोन दिवसात पूर्ण होऊन पाणी पुरवठा पूर्ववत सुरू होईल अशी ग्वाही दिली. मतदार संघातील जनतेने या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन शेवटी त्यांनी केले .

अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे यांनी रायगड जिल्हा परिषदेने ५० लाखाची तरतूद करीत बियाणांचे वाटप शेतकऱ्यांना केले आहे. या शिबिरात अर्ज केल्यावर एका दिवसात उत्तर व समाधान मिळत असल्याने ही संधी जनतेने सोडू नये असे आवाहन केले.

## म्हसळा ग्रामीण रुग्णालयात फार्मासिस्टच्या अंगावर टाकला कचरा; कर्मचाऱ्यांकडून निषेध



**श्रीवर्धन : बातमीदार**

म्हसळयाच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये एक विचित्र प्रकार त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनुभवास आला आहे. नुकतेच मनसेचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष यांनी म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी फार्मासिस्टच्या रूममध्ये गेले असता त्यांना त्या ठिकाणी धूळ व जळमटे आढळून आली. यावेळी कपाटावर साचलेली धूळ व जळमटे सदर फार्मासिस्टला त्या ठिकाणी उभे करून त्याच्या डोक्यावर व त्याच्या कर्तव्यावर घातलेल्या गणवेशा वरती टाकण्यात आली. त्यामुळे कर्मचारी वर्गामधून या गोष्टीबाबत तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हाध्यक्षांनी रुग्णालयाला भेट दिल्यानंतर त्या ठिकाणी अस्वच्छते बाबत आवाज उठविला ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु त्या ठिकाणचे वैद्यकीय अधीक्षक किंवा त्या ठिकाणी काम करणारे सफाई कामगार यांच्या ही बाब निदर्शनास आणून देणे गरजेचे होते. त्या ठिकाणी रुग्णांना औषधाचे वाटप करणाऱ्या फार्मासिस्टच्या अंगावरती कचरा टाकून त्याला अपमानित करण्याचा घडलेला प्रकार हा शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर प्रकार मानला जात आहे. फार्मासिस्टच्या रूम नंतर त्यांनी स्वच्छतागृहाला देखील भेट दिली. यावेळी स्वच्छतागृह देखील अस्वच्छ असल्याचे पाहायला मिळाले. तसेच त्या ठिकाणी असलेले वॉश बेसिन गुटखा थुंकुन पूर्णपणे लाल झालेले पाहायला मिळाले. मात्र या गोष्टी सदर पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयाचे व्यवस्थापन करणाऱ्या वैद्यकीय अधीक्षक किंवा त्या ठिकाणी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करणे आवश्यक होते.

कनिष्ठ कर्मचाऱ्यांना याबाबत विचारणा करून काय साध्य करता आले? असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे. एक तर श्रीवर्धन म्हसळा तालुक्यात कोणीही कर्मचारी काम करण्यासाठी येत नाही. त्यामुळे आरोग्य विभागातील अनेक पदे अनेक वेळेला रिक्त असल्याचे पाहायला मिळते. रुग्णालयात अस्वच्छता आहे. तर ही बाब राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे किंवा त्या ठिकाणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सांगणे आवश्यक असताना कनिष्ठ कर्मचाऱ्यांना त्रास देण्याचे कारण काय? असा प्रश्न कर्मचाऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

## मच्छीमारांना सॅटेलाईट फोन; महाराष्ट्र कृती समितीकडून स्वागत

**मुरुड : प्रतिनिधी**

राज्यातील मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारी करताना कोणत्याही परिस्थितीत किनाऱ्याशी संपर्क साधता यावा, आपत्कालीन प्रसंगी तात्काळ मदत मिळावी आणि हवामान तसेच सुरक्षा सूचना वेळेवर प्राप्त व्हाव्यात, यासाठी सॅटेलाईट फोन सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.या निर्णयाचे स्वागत महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा मच्छीमार सहकारी सोसायटी चे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी केले आहे.

समुद्रात गेलेल्या मच्छीमार बांधवांना खोल समुद्रात मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने अनेक अडचणी निर्माण होतात.यांची दखल राज्य सरकारांचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी घेऊन खोल समुद्रात संपर्क राखण्यासाठी सॅटेलाईट फोनद्वारे मोबाईल नेटवर्क नसलेल्या समुद्रातील दुर्गम भागातही सातत्यपूर्ण संपर्क साधता येणार आहे.

## अजित हरित अभियानांतर्गत माणगावातील जावळी येथे वृक्षारोपण



**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त बुधवार दि. २२ जुलै रोजी जावळी येथे 'अजित हरित अभियान' (एक वृक्ष : हरित भविष्य) अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती वरदा सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. "झाड लावू... झाड जगवू... हरित महाराष्ट्र घडवू..." हा संदेश देत मान्यवरांच्या हस्ते विविध रोपांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माणगाव, ग्रुप ग्रामपंचायत लोणशी आणि गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जावळी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा आणि तीर्थस्वरूप श्री. नानासाहेब धर्माधिकारी इंग्लिश स्कूल, जावळीच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी, पंचायत समिती उपसभापती मनिषा मालोरे, जि. प. सदस्य अस्लम राऊत, तालुकाध्यक्ष बाळाराम नवगणे, तालुका सरचिटणीस राजेंद्र शिर्के, तालुका कार्याध्यक्ष अॅड. सुशील दसवते, लोणशी सरपंच सिद्धेश पालकर, खरवली सरपंच संतोष खडतर, गजानन अधिकारी, वारक सरपंच वैष्णव साठे, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी वृक्षारोपणाच्या माध्यमातून अजितदादांच्या विकासविचारांना वंदन करत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

## सर्वसामान्य जनतेची काळजी घेणारे महायुती सरकार –आमदार महेंद्र थोरवे



**चौक : प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेला न्याय देणारे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेल्या आदर्शा नुसार सामान्य माणसाला त्याच्या न्यायहक्काचे लाभ आणि प्रमाणपत्र घरपोच देण्याचे काम प्रशासनाच्या माध्यमातून सरकार करीत आहे, असे प्रतिपादन खालापूर कर्जत चे आमदार महेंद्र थोरवे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून खोपोली येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर महाराजा मंगल कार्यालय खोपोली येथे आयोजित करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप विभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी केले.यावेळी सर्व प्रकारची प्रमाणपत्र,दाखले,सानुग्रह अनुदान आमदार महेंद्र थोरवे, खोपोली नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, खालापूर नगराध्यक्षा रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, उप विभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, गटविकास अधिकारी संदीप कराड, तहसीलदार अभय चव्हाण, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल, उप सभापती भाई शिंदे व अन्य मान्यवर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

राज्यातील महिलांना शेतकरी दर्जा, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व देण्याची सनद वाटप, मुख्यमंत्री बळीराजा शेत व पाणंद रस्ते योजना,शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, तुकडेबंदी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी "स्थानिक क्षेत्र" घोषणा. "जिवंत सातबारा" मोहीम, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण,घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांसाठी वाटप व विशेष तरतूद, शेतजमिनीच्या कौटुंबिक वाटणी पत्रावरील नोंदणी फी पूर्णपणे माफ संबंधी माहिती देणे.

नगरपालिकेच्या विविध प्रमाणपत्र व योजनांचा लाभ,तालुका भूमिअभिलेख कार्यालयाची स्वामीत्व योजना यांचे प्रमाणित पत्र वाटप, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाद्वारे लाभार्थ्यांना देण्यात आलेले साहित्य वितरण, आरोग्य विभाग यांचे कडील सेवा व योजना, आदिवासी विभाग यांचे कडील सेवा व योजना, महिला व बाल विकास योजनेचे वाटप इ. योजनांचे वाटप करण्यात आले.

## खोपोली भाजपच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी, बातमीदार**

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवाभाऊ उर्फ देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, खोपोलीतही भारतीय जनता पक्षाच्या वतीने रक्तदान शिबिराचे व नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या हस्ते करण्यात आले, प्रांताधिकारी प्रकाश संकपाळ यांनी तसेच उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी रक्तदान करून शुभारंभ केला, या शिबिराला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, एकूण ४० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. शिबिराला कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी भेट देऊन कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविला,

यावेळी खोपोली नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, शिवसेनेचे शहर प्रमुख लक्ष्मण रिठे, भारतीय जनता पक्षाचे खोपोली शहर अध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, विकास खुरपडे, अपर्णा साठे, सुनीती महर्षी, व्यापारी सेलचे संजय तन्ना, नगरसेविका अश्विनी अत्रे, मोहसीना शेख, कार्यकर्ते विभा पाठक, संतोष लोहर अनिल कर्णिक त्याचबरोबर अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या बाजूला तहसील कार्यालयाचे दाखले वाटप शिबीर सुरू होते त्या शिबिराला आलेल्या अनेकांनी ही रक्तदान शिबिरात भाग घेतला.

## पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागात डॉक्टर आपल्या दारी उपक्रम यशस्वी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

सध्या पावसामुळे आणि साधन नसल्यामुळे वयस्कर ग्रामीण भागातील जनतेला तालुक्याच्या ठिकाणी दवाखान्यात जाता येत नाही. त्यांचा आजार वाढू नये, यासाठी श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशन संस्थेने गावोगावी जाऊन औषधे व डॉक्टरांची सोय करून त्यांची मोफत तपासणी करून आवश्यक औषधे देण्याचे काम सुरू केले आहे. या उपक्रमाला ग्रामीण जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



पोलादपूर तालुक्यात श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशन ही संस्था गेल्या आठ ते दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबवत आहे. यंदापासून श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशन संस्थेने पावसाळ्यात गावोगावी जाऊन 'डॉक्टर आपल्या दारी' उपक्रम चालू करीत हा दरवर्षी चालू राबविण्याचा मानस व्यक्त केला आहे.

यावर्षी श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशनतर्फे भोगाव, कोंढवी, देवपूर, ओबळी,पैठण, चरई, वडाचा कोंड व इतर ठिकाणी जाऊन मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशनचे किसनदादा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरांचे आयोजन करण्यात आले. डॉ. दिव्या सोनवणे,डॉ.गुलाबराव सोनवणे व आशा सेविका स्मिता चिकणे यांचे मोलाचे सहकार्य झाले.

# बॉक्सिंग क्वीन लव्हलिनाची कमाल!

## कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारताचे पहिले पदक निश्चित

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

ग्लासगो येथे रंगणाऱ्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६ स्पर्धेतील उद्घाटन सोहळ्यापूर्वीच भारताच्या खात्यात पहिले पदक निश्चित झाले आहे. ऑलिम्पिक पदकविजेती लव्हलिना बोर्गोहेन हिने महिला बॉक्सिंगमध्ये ७५ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत थेट प्रवेश मिळवत भारतासाठी किमान कांस्यपदक निश्चित केले आहे.

आसामच्या लव्हलिनाला तिच्या गटात थेट 'बाय' मिळाल्यामुळे उपांत्य फेरीत प्रवेश मिळाला. कॉमनवेल्थ गेम्समधील बॉक्सिंगच्या नियमानुसार उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या दोन्ही खेळाडूंना कांस्यपदक दिले जाते. त्यामुळे लव्हलिनाने एकही सामना न खेळता किमान कांस्यपदक पक्के केले आहे. आता लव्हलिना ३१ जुलै रोजी टी.के.बी.पी. ताफाकी हिच्याविरुद्ध उपांत्य फेरीचा सामना खेळणार आहे. या सामन्यात विजय मिळवल्यास ती सुवर्णपदकाच्या लढतीत प्रवेश करेल. पराभव झाला तरी तिचे कांस्यपदक कायम राहणार आहे.



महिला ७५ किलो मिडलवेट गटात केवळ पाच बॉक्सर सहभागी आहेत. त्यामुळे स्पर्धेची ड्रॉ लहान असल्याने अव्वल मानांकित असलेल्या लव्हलिना बोर्गोहेनसह तीन खेळाडूंना थेट उपांत्य फेरीत स्थान देण्यात आले. उर्वरित दोन खेळाडूंमध्ये एकमेव उपांत्यपूर्व सामना होणार असून त्यातील विजेता उपांत्य फेरीत पोहचेल.

कॉमनवेल्थ गेम्सच्या नियमानुसार उपांत्य फेरी गाठणाऱ्या चारही खेळाडूंमध्ये अंतिम फेरीत पोहचणारे दोघे सुवर्ण आणि रौप्यपदकासाठी खेळतात, तर पराभूत होणाऱ्या दोघांना संयुक्तपणे कांस्यपदक दिले जाते. त्यामुळे लव्हलिनाचे पदक आधीच निश्चित झाले आहे.

उद्घाटनापूर्वीच मिळालेल्या या पदकामुळे १२६ सदस्यीय भारतीय ताफ्याला मोठा आत्मविश्वास मिळाला आहे. यंदाच्या स्पर्धेचे स्वरूप पूर्वीपेक्षा लहान असले तरी भारत अनेक क्रीडा प्रकारांत पदकांचा दावेदार मानला जात आहे. विविध क्रीडा प्रकारांत भाग घेण्यासाठी भारताचा १२५ खेळाडूंचा संघ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी गेला आहे. भारतीय पथक ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, ज्युडो, आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स, ट्रॅक सायकलिंग, बॉल्स आणि जलतरण या आठ क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणार आहे.

# सतीश पाताडे यांचे राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत 'रूपेरी' यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय मास्टर्स पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सतीश मुरलीधर पाताडे यांनी मास्टर्स-३ स्पर्धेत चार रौप्यपदक जिंकली आहेत. शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित असलेले पाताडे हे राज्य शासनाचे सेवानिवृत्त कक्ष अधिकारी असून पॉवरलिफ्टिंग खेळामध्ये त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्य, जिल्हा स्पर्धेत अनेक पदके प्राप्त केलेली आहेत.

मुंबईमध्ये बालपण गेलेले पाताडे हे सध्या ठाणे जिल्ह्याचे रहिवासी आहेत. या राष्ट्रीय स्पर्धेच्या दरम्यान




त्यांना शोल्डर इन्ज्युरी व प्रचंड वेदना असतानाही संयम व जिद्दीने त्यांनी पदके मिळविली. स्पर्धेसाठी त्यांना शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त अनंत चाळके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे पत्नी भारती पाताडे आणि मुली संज्योत, श्रुती यांचे पाठबळ लाभले. पाताडे यांचे अभिनंदन केले जात आहे.

# कोल्हापुरात साकारणार आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम

**मुंबई : प्रतिनिधी**

कोल्हापूरच्या समृद्ध क्रीडा परंपरेत एक सुवर्ण पान जोडले गेले असून शहरात जागतिक दर्जाचे आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम उभारण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या ऐतिहासिक प्रकल्पासाठी क्रीडा विभाग आणि कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्यात सामंजस्य करार पार पडला.



या भव्य प्रकल्पासाठी करवीर तालुक्यातील विकासवाडी येथील १२.७६ हेक्टर म्हणजेच तब्बल ३१.९० एकर शासकीय जागा कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडे भाडेपट्ट्याने हस्तांतरित करण्यात आली आहे. असोसिएशनचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती आणि क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांनी या करारनाम्यावर स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह इतर प्रमुख नेते आणि शासकीय अधिकारी उपस्थित होते.

बीसीसीआय आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या सर्व आधुनिक निकषांनुसार हे स्टेडियम उभारले जाणार आहे. यामध्ये सुमारे ३५ हजार प्रेक्षक बसू शकतील अशी व्यवस्था असेल. यासोबतच अत्याधुनिक पॅव्हेलियन, सराव मैदाने, इनडोअर प्रशिक्षण केंद्र, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, क्लब हाऊस, फ्लडलाइट्स, खेळाडू आणि प्रेक्षकांसाठी भव्य वाहनतळ, सौर ऊर्जा प्रकल्प आणि अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा उभारण्यात येणार आहे तसेच येथे एक खास क्रिकेट म्युझियमही साकारले जाणार आहे.

**मल्टी स्पोर्ट्स हबची संकल्पना**

विशेष म्हणजे हे मैदान केवळ क्रिकेटपुरते मर्यादित न राहता एक मल्टी स्पोर्ट्स हब म्हणून विकसित केले जाणार आहे. येथे कुस्ती, जलतरण, बॉक्सिंग, ज्युडो, आर्चरी, टेबल टेनिस आणि फेन्सिंग यांसारख्या विविध खेळांसाठीही अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. या प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील नवोदित खेळाडूंना मोठा दिलासा मिळणार असून क्रीडा पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेला आणि रोजगारालाही मोठी चालना मिळणार आहे.

# विश्व विद्यापीठ स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धा प्रथमच भारतात

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑलिम्पिकपूर्व महत्त्वाची मानली जाणारी एफआयएसयू विश्व विद्यापीठ स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धा प्रथमच भारतात होत असून १४ देशांतील विद्यार्थी-खेळाडू सहभागी होणार आहेत. सोमैया विद्याविहार विद्यापीठाच्या सहकार्याने ३ ते ९ ऑगस्ट या कालावधीत स्पर्धा मुंबईत खेळली जाईल.

स्पर्धेत सिंगापूर, हाँगकाँग (चीन), इराण, जपान, स्पेन, कोरिया, न्यूझीलंड, युनायटेड किंगडम, ब्राझील, स्वित्झर्लंड, पोलंड, दक्षिण आफ्रिका, चीन आणि भारत या देशांचा सहभाग असेल.

भारताकडून यजमान सोमैया विद्याविहार विद्यापीठातील सूरज जैन, ओम सोमवांशी, निश्मा दुबे तसेच मद्रास विद्यापीठाच्या आर.आर. पूजा आरती आणि एसआरएम विद्यापीठाच्या शनिवा रियाझ यांचा संघ सहभागी होणार आहे. या स्पर्धेच्या आयोजनात एफआयएसयू, असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज आणि सोमैया विद्याविहार विद्यापीठ यांची प्रमुख भूमिका आहे.

एआययूचे सचिव डॉ. (प्रा.) पंकज मित्तल, एफआयएसयूचे सचिव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मॅथियास रेमुंड, सोमैया विद्याविहार विद्यापीठाचे कुलपती समीर सोमैया, कुलगुरू प्रा. अजय कुमार तसेच स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक एलान जैन यांनी ही स्पर्धा भारतीय विद्यापीठीन क्रीडेसाठी ऐतिहासिक ठरणार असून विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचा अनुभव मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# राष्ट्रीय पोलीस गेम्ससाठी सुभाष पाटील स्पर्धाप्रमुख

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय पोलीस दल, पोलीस खेळ मंत्रालय आणि तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित पोलीस गेम्स राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा हैदराबाद येथील बालयोगी इनडोअर स्टेडियममध्ये २३ ते २७ जुलैदरम्यान होणार आहे. या स्पर्धेसाठी रायगडचे सुपुत्र तायक्वांदोचे आंतरराष्ट्रीय पंच व सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट सुभाष पाटील यांची स्पर्धा प्रमुख म्हणून निवड झाली आहे.

याचबरोबर पंच म्हणून प्रशांत घरतची निवड झाली आहे, तर खेळाडू म्हणून नवी मुंबई पोलीस मयुरी खरात



हिची निवड झाली आहे.

गेल्या वर्षी काश्मीर येथे आयोजित राष्ट्रीय पोलीस स्पर्धेत सुभाष पाटील यांचा सहभाग होता. त्यांच्या अनुभवाचा फायदा पोलीस खेळाडू, प्रशिक्षक व पंच यांना व्हावा म्हणून देशातील या खेळाची अधिकृत शिखर संघटना तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांनी पाटील यांची हैदराबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय पोलीस गेम्स तायक्वांदो स्पर्धा प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

सुभाष पाटील तसेच प्रशांत घरत व मयुरी खरात यांची राष्ट्रीय पोलीस स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल रायगड तायक्वांदो असोसिएशन आणि तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे पदाधिकारी, प्रशिक्षक तसेच आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# डेव्हिड वॉर्नर ड्रिंक ॲण्ड ड्राइव्ह प्रकरणात दोषी

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीवीर खेळाडू डेव्हिड वॉर्नर पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. वॉर्नरने न्यायालयात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याची कबुली दिली असून त्याला नऊ महिन्यांपर्यंत तुरुंगवास, दंड आणि ड्रायव्हिंगवर बंदी अशी शिक्षा मिळू शकते. या प्रकरणामुळे त्याचे सिडनी थंडर संघाचे कर्णधारपदही धोक्यात आले आहे.

सिडनीतील स्थानिक न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान वॉर्नरचे वकील बॉबी हिल यांनी त्याच्या वतीने दोषी असल्याची कबुली दिली. वॉर्नर स्वतः न्यायालयात उपस्थित नव्हता. हे प्रकरण ५ एप्रिल रोजी घडले होते. वॉर्नरच्या वकिलांनी न्यायालयाबाहेर सांगितले की, मित्राच्या घरी तीन ग्लास वाईन घेतल्यानंतर वॉर्नरने मोठी चूक केली. शेवटचा पेग घेतल्यानंतर त्याने कार चालवण्याचा निर्णय घेतला. राईड-शेअर सेवा वापरण्याऐवजी स्वतः वाहन चालवण्याचा निर्णय हा बेजबाबदार आणि चुकीचा असल्याचे त्यांनी मान्य केले.

न्यू साऊथ वेल्सच्या कायद्यानुसार पहिल्यांदाच मद्यधुंद वाहन चालवण्याच्या गुन्ह्यात दोषी ठरल्यास कमाल नऊ महिन्यांपर्यंत तुरुंगवास, २,२०० ऑस्ट्रेलियन डॉलर्सपर्यंत दंड, ६ ते १२ महिन्यांसाठी वाहन चालवण्यास बंदी अशी शिक्षा होऊ शकते. या प्रकरणाचा अंतिम निकाल १८ ऑगस्ट रोजी जाहीर होणार आहे.

**सिडनी थंडरचे कर्णधारपद धोक्यात**

या गुन्ह्याचा परिणाम वॉर्नरच्या क्रिकेट कारकिर्दीवरही होण्याची शक्यता आहे. सिडनी थंडर संघाचा कर्णधार म्हणून त्याचे पद आता धोक्यात आले असून न्यायालयाचा निकाल आल्यानंतर क्रिकेट न्यू साऊथ वेल्स आणि सिडनी थंडर व्यवस्थापन त्याच्या कर्णधारपदाबाबत निर्णय घेणार आहे. २०१८मध्ये दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन बॉल टॅम्परिंग प्रकरणामुळे वॉर्नरवर क्रिकेट ऑस्ट्रेलियाने बंदी घातली होती, मात्र २०२४मध्ये या बंदीचा पुनर्विचार करून त्याला पुन्हा संघाचे नेतृत्व करण्यास पात्र ठरवण्यात आले.

# वैभव सूर्यवंशीचा अर्धशतकासह विश्वविक्रम

**हरारे : वृत्तसंस्था**

वैभव सूर्यवंशीने वादळी खेळी करत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अखेरीस आपली छाप पाडली आहे. हरारेमध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात या डावखुऱ्या फलंदाजांने शानदार अर्धशतक झळकावलं. सूर्यवंशीने अवघ्या १८ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केलं. १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीचं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हे पहिलंच अर्धशतक ठरलं. यासह वैभवने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मोठा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.

इंग्लंड दौऱ्यादरम्यान पदार्पण केल्यानंतर वैभव सूर्यवंशीला दोन्ही सामन्यात फारशी चांगली खेळी करता आली नाही. त्यामुळे वैभवच्या कामगिरीबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. पण आता झिम्बाब्वेविरूद्ध टी-२० मालिकेतील पहिल्याच सामन्यात त्याने अर्धशतकी खेळी साकारत आपला फॉर्म दाखवून दिला आहे. वैभवने सामन्याच्या दुसऱ्याच षटकात २ षटकार एक चौकार लगावत २० धावा कुटल्या होत्या. अर्धशतक करताच वैभव पुढच्या चेंडूवर झेलबाद झाला. बाद होण्यापूर्वी वैभवने १९ चेंडूत ४ चौकार व ४ षटकारांसह २६३च्या स्ट्राईक रेटने ५० धावांची खेळी केली.




वैभव सूर्यवंशी हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अर्धशतक झळकावणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. तसेच, सर्वात कमी चेंडूंत टी-२० अर्धशतक पूर्ण करणारा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे. १५ वर्षे आणि ११८ दिवस वय असताना हे अर्धशतक झळकावत वैभवने नेपाळच्या कुशल मल्लाचा यापूर्वीचा विक्रम मोडला. मल्लाने ८ फेब्रुवारी २०२० रोजी कीर्तिपूर येथे अमेरिकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात, १५ वर्षे आणि ३४० दिवस वय असताना अर्धशतक केलं होतं.

विशेष म्हणजे, १६ वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय पुरुष क्रिकेटमध्ये ५०+ धावांची खेळी करणारा वैभव सूर्यवंशी हा जगातील दुसराच खेळाडू ठरला आहे. याआधी नेपाळच्या कुशल मल्लाने २०२० मध्ये अमेरिकेविरुद्धच्या वनडे सामन्यात १५ वर्षे ३४० दिवसांच्या वयात अर्धशतक झळकावलं होतं.

# भारताला २०३० राष्ट्रकुलचे यजमानपद

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

अहमदाबादमधील सुसज्ज आणि जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधांमुळे भारताला २०३०च्या शंभराव्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळाल्याची माहिती राष्ट्रकुल क्रीडा संघटनेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीइओ) केटी सॅडलेर यांनी दिली. भारताची बोली संघटनेच्या सुधारित आणि कमी खर्चाच्या यजमानपद प्रारूपाशी सुसंगत आहे, असे त्यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना स्पष्ट केले.




गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये भारताला या ऐतिहासिक खेळांचे यजमानपद बहाल करण्यात आले होते. ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया राज्याने वाढत्या खर्चामुळे २०२६च्या स्पर्धा आयोजनातून माघार घेतली होती. त्यानंतर खर्च आटोक्यात आणण्यासाठी राष्ट्रकुल संघटनेने नवीन धोरण स्वीकारताना क्रीडा प्रकारांची संख्या कमी केली.

''२०३०च्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारत आणि नायजेरिया या आमच्या दोन मोठ्या सदस्यांनी स्वारस्य दाखवले होते. भारतात आधीच जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा सज्ज होत्या. त्यामुळे नवीन बांधकामांवर मोठा खर्च करण्याची गरज नव्हती. सरकारची ही गुंतवणूक कौतुकास्पद आहे,'' असे सॅडलेर म्हणाल्या. २०३०च्या राष्ट्रकुलमध्ये भारताचा पारंपरिक क्रीडा वारसा जगासमोर आणला जाणार आहे.

यामध्ये कबड्डी, खो-खो, मल्लखांब आणि योगासन या देशी खेळांचा समावेश करण्याबाबत सध्या गांभीर्याने विचार सुरू आहे. यजमान देशाच्या संस्कृतीची झलक दाखवतानाच हे खेळ इतर राष्ट्रकुल देशांमध्येही लोकप्रिय आणि स्पर्धात्मक बनवण्यासाठी आंतरराष्ट्रीय महासंघांसह काम केले जाईल, असेही सॅडलेर यांनी नमूद केले.

# विराटचा सल्ला सिंधूसाठी ठरला गेमचेंजर!

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

२०२५मधील गंभीर दुखापतीनंतर करिअरमधील अत्यंत कठीण टप्प्यातून बाहेर पडण्यासाठी माजी कर्णधार विराट कोहलीशी झालेल्या एका संवादाने कशी मदत केली यावर दोन वेळची ऑलिंपिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने उघडपणे भाष्य केले आहे. या संवादातून मिळालेल्या प्रेरणेमुळेच मी ऐतिहासिक जपान ओपन विजेतेपदावर नाव कोरत जबरदस्त पुनरागमन केले, असेही तिने म्हटले आहे.



सप्टेंबर २०२५मध्ये सरावादरम्यान सिंधूच्या पायाच्या बोटाचा लिगामेंट फाटला होता. त्यामुळे तिला तो हंगाम अर्धवट सोडून पूर्णपणे दुखापतीतून सावरण्यावर (रिहॅब) लक्ष केंद्रित करावे लागले होते. प्रसिद्ध क्रीडा अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. दिनशा पारडीवाला यांच्या देखरेखीखाली सिंधूने तीन महिने पूर्ण विश्रांती घेतली आणि त्यानंतर पुनर्वसनाची टप्प्याटप्प्याने प्रक्रिया पूर्ण केली.त्या आव्हानात्मक काळात सिंधूने तिचे पती व्यंकट दत्ता साई यांच्यासह मार्गदर्शन मिळवण्यासाठी विराट कोहलीशी संपर्क साधला होता. माजी भारतीय कर्णधाराने त्याला तत्काळ प्रतिसाद दिला आणि दुसऱ्याच दिवशी त्या तिघांची भेट झाली.

पतीच्या मुलाखतीचा संदर्भ देत सिंधूने सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून ही भावनाप्रधान आठवण शेअर केली. कोहलीसोबतची ती भेट तिच्या पुनरागमनासाठी कशी 'टर्निंग पॉइंट' ठरली यावर तिने प्रकाश टाकला. तिने लिहिले आहे की, ज्या एका गोष्टीसाठी मी नेहमीच कृतज्ञ राहीन, ती म्हणजे 'विराट भाई. माझ्या कारकिर्दीतील अत्यंत बिकट प्रसंगी मी त्याच्याशी संपर्क साधला होता. दुखापती वाढत होत्या, कामगिरी होत नव्हती आणि मला अशा व्यक्तीची गरज होती जो ही परिस्थिती समजू शकेल.त्याने अवघ्या काही मिनिटांत उत्तर दिले आणि आम्ही दुसऱ्याच दिवशी भेटलो.

यावेळी विराटचा सर्वांत मोठा सल्ला हा होता की, ट्रॉफीच्या मागे धावण्याऐवजी खेळात पुन्हा एकदा आनंद शोधला पाहिजे. ती म्हणाली की, आता ती सकाळी ५.३० वाजता सरावासाठी ट्रॉफी जिंकण्यासाठी नाही, तर खेळाप्रति तिच्या आवडीमुळे उठते. या मानसिक बदलासह सिंधूने तिच्या खेळात अनेक सुधारणा केल्या. तिने सुमारे साडेतीन किलो वजन कमी केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com